७५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ७०१

# विश्वविज्ञानमाला

१

# कैसर.

REFBK-0001413

विश्वविज्ञानमाला.

१

# जर्मन बादशहा

# दुसरा कैसर विल्यम

## याचें संक्षिप्त चरित्र.

१८५९–१९१४.

लेखक

रा.

REFBK-0001413

शके १८३९. सन १९१७.

अष्टेकर आणि मंडळी. पुणें.

किंमत

साधी बांधणी सहा आणे.

कापडी बांधणी दहा आणे.



जर्मन बादशहा
दुसरा कैसर विल्यम.

C. S. P. P.

Printed by Mr. R. V. Phadatare at his *Sudharak Printing Bureau* at 450 Sadashiva Peth, Poona and Published by Mr. P. N. Patavardhan at 652 Sadashiva Peth, Poona, for the Ashtekar Company.

# प्रस्तावना.

१९१४ च्या आगष्ट महिन्यापासून युरोप खंडांत जें महायुद्ध चाललें आहे त्या युद्धानें आमच्या हिंदुस्थान देशांतल्या लोकांवर एक मोठा उपकार केला आहे. तो हा कीं, आमची दृष्टि विशाल करून आह्मांस सगळ्या जगाकडे पहावयास भाग पाडलें आहे. विहीरींतल्या बेडकांना ज्याप्रमाणें विहीर एवढेंच जग आहे असें वाटतें, त्याप्रमाणें आह्मां हिंदुस्थानांतल्या बेडकांना आजपर्यंत हिंदुस्थान एवढेंच जग आहे आणि हिंदुस्थानाखेरीज इतर जगाशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं असें वाटत असे. पण प्रस्तुतच्या महायुद्धामुळें ही स्थिति पालटूं लागली आहे. जगांत आज जीं राष्ट्रें आहेत त्या सर्वांचे इतिहास आपण वाचले पाहिजेत, त्यांचा आपल्या ब्रिटिश सरकाराशीं यापूर्वी कसकसा संबंध आलेला आहे, व पुढें कसकसा येण्याचा संभव आहे, आज जगामध्यें जगाच्या हिताहिताचे कोणते प्रश्न आहेत, ते जगांतले लोक कोणत्या रीतीनें सोडविण्याच्या उद्योगांत आहेत, त्यांमध्यें आपण कांहीं करूं शकूं किंवा नाहीं, इत्यादि बाबींकडे हिंदुस्थान यापुढें जर लक्ष न घालील तर हिंदुस्थान हें जीवंत राष्ट्र नाहीं असें समजून जग आपल्या मार्गानें पुढें चालेल, या गोष्टी आपल्या डोळ्यापुढें

या महायुद्धानें ढळढळीत आणून दिल्या आहेत. हें युद्ध जगाचा इतिहास पालटणार आहे ही गोष्ट आह्मांस गेल्या तीन वर्षांत आमची मंद बुद्धि मंद मंद गतीनें पटवून देत आहे. तरी आमचा आळस आणि आमचें बुद्धिमांद्य अद्याप लयाला गेलें नाहीं. युद्ध सुरू झाल्याला पुरीं तीन वर्षे होऊन गेलीं, तरी युद्धविषयक ग्रंथ आमच्या मराठी भाषेंत पुरते दहा देखील निघाले नाहींत; आणि युद्ध सुरू झाल्यानंतर दोन वर्षांच्या आंत एकट्या जर्मनीमध्यें युद्धविषयक नवीन ग्रंथ ६४०० निघाले व इंग्लंडमध्यें ४००० निघाले. जर्मनी, फ्रान्स, आस्ट्रिया, टर्की, रशिया इत्यादि मोठमोठाल्या देशांचे इतिहास अद्याप मराठींत नाहींत; अथवा कैसर, ट्रीस्टके, किचनेर, एनव्हर वे यांचीं चरित्रेंहि अद्याप मराठींत होत नाहींत. मग लढाई कशी करतात, विमानें कशीं उडतात, लढाऊ जहाजांची रचना कशी असते या प्रकारची माहिती देणाऱ्या अथवा युद्धामुळें उपस्थित झालेल्या राजकारणविषयक प्रश्नांचा ऊहापोह करणाऱ्या पुस्तकांचें तर नांवच काढावयास नको. यावरून आमच्या लेखकवर्गानें अद्याप या विषयाचा अभ्यासच केला नाहीं असें दिसतें. तें कांहीं असो, मराठी वाचकांना हिंदुस्थानाबाहेरच्या जगाची थोडीशी तरी माहिती देणें अवश्य आहे असें वाटून आह्मीं प्रथमतः हें कैसरचें संक्षिप्त चरित्र हातीं घेतलें.

आजकाल कैसर हें एक जंगी प्रस्थ आहे. १८८८ पासून आजपर्यंत या जर्मन बादशहाचें राज्य जर्मनींत चालू

आहे. नेपोलियनच्या नंतर युरोपांतल्या बादशहांमध्यें जंगी माणूस असा हाच झाला. १८१५ सालीं इंग्रज, जर्मन, रशियन, स्पानिश वगैरे राष्ट्रांनीं— इंग्लंड, जर्मनी, रशिया, स्पेन वगैरे देशांच्या राजांनीं नव्हे— नेपोलियनची रवानगी सेंट हेलेना बेटांत केल्यापासून इतिहासांत **राष्ट्रीयत्व** नांवाचें नवीन तत्त्व निर्माण झालें, आणि तेव्हांपासून या तत्त्वानें झगडा चालविला असून आजच्या युद्धांत या तत्त्वाचा जगभर कायमचा जयजयकार होणार आहे. अर्थात् यापुढें इतिहास ह्मणजे 'एकतंत्री राजांचीं चरित्रें' ही व्याख्या कोणालाहि करतां यावयाची नाहीं. इतिहास ह्मणजे 'राष्ट्रांचीं चरित्रें' हीच व्याख्या यापुढें कायम होणार. यापुढील इतिहासांत ज्या ज्या व्यक्तींना 'जंगी माणूस' (towering personality) या नात्यानें मिरविण्यास सांपडेल त्यांना लोकांचे पुढारी ह्मणूनच मिरवावें लागेल, बादशाही सत्तेचा उपभोग आतां त्यांना मिळणार नाहीं. बादशाही सत्तेचा उपभोग घेणारे अनेक जंगी माणूस यापूर्वी होऊन गेले, पण आजमित्तीस जर्मन बादशहा दुसरा **कैसर विल्हेम** (अथवा इंग्रजांमध्यें **विल्यम**) याखेरीज दुसरा कोणी उरलेला नाहीं. १९१४ सालीं कैसरखेरीज दुसरेहि दोन बादशहा जीवंत होते, एक आस्ट्रियाचा आणि दुसरा रशियाचा. पण आस्ट्रियाचा बादशहा मेला आणि रशियाचा बादशहा आज आपल्या प्रजाजनांच्या अटकेंत आहे. आतां उरलेला जो कैसर हा वरील प्रभावळी-

तला शेवटचा होय. कैसरचें चरित्र ह्मणजे त्या काळापुरता जर्मनीचा इतिहास ही गोष्ट आज खरी आहे. पण कैसरच्या आयुष्याबरोबर— कदाचित् त्याच्या हयातींतहि— ही गोष्ट खोटी होणार आहे. सर्व जगभर लोकसत्ता विजय मिळवीत असल्यामुळें कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासांत राजाचें महत्त्व यापुढें नष्ट होणार अशीं आज स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. तथापि पुढें कांहींहि होवो, आजमित्तीस कैसर ही व्यक्ति असामान्य आहे व त्याच्या चरित्राला ऐतिहासिक महत्त्व आहे. अर्थात् त्याच्या चरित्रांत प्रस्तुतच्या महायुद्धाचा पूर्वेतिहास बराच सांठविलेला आहे. ह्मणून त्याचें संक्षिप्त चरित्र आह्मी मराठी वाचकांपुढें मांडीत आहों.

हरि रघुनाथ भागवत.

पुणें. आषाढ वद्य ११ शके १८३९.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ | उपोद्घात. | १ |
| २ | बालपण आणि तारुण्य. | ६ |
| ३ | कैसरचें राज्यारोहण आणि बिस्मार्कचा राजीनामा. | १९ |
| ४ | जर्मनीची भरभराट. | २८ |
| ५ | मोरोक्को. | ४७ |
| ६ | डेली टेलिग्राफ. | ५७ |
| ७ | किरकोळ गोष्टी. | ६४ |
| | कैसरची व्यक्तिविषयक माहिती. | ७१ |
| | कैसरचे कांहीं उद्गार. | ७४ |
| | कैसरच्या आयुष्यांतील मुख्य गोष्टींची जंत्री. | ७६ |

# आधारभूत इंग्रजी ग्रंथांची यादी.

(१) प्रोफेसर स्टॅनले शॉ एल एल. डी. यांनीं लिहिलेलें कैसरचें चरित्र. मुख्यतः याच ग्रंथाच्या आधारानें हें छोटें पुस्तक लिहिलें आहे. कांहीं ठिकाणीं पुढील ग्रंथांचाहि उपयोग झाला—

(२) डा. जे. हालंड रोज एल एल. डी. यांचें "कैसर" या विषयावरील व्याख्यान.

(३) मि. प्राइस कोलियर यांच्या "जर्मनी आणि जर्मन लोक" या पुस्तकांतील कैसरवरील प्रकरण.

# जर्मन बादशहा
# दुसरा कैसर विल्यम
## याचें संक्षिप्त चरित्र.

---

### प्रकरण १—उपोद्घात.

जर्मन बादशहा दुसरा विल्यम याचा जन्म तारीख २७ जानेवारी १८५९ रोजीं बर्लिन येथें झाला. १५ जून १८८८ रोजीं तो गादीवर बसला. अर्थात् आज २८ वर्षें तो जर्मनीचा राज्यकारभार चालवीत असून त्याचें वय ५८ वर्षांचें आहे.

जर्मनीचा राज्यकारभार आणि इंग्लंडचा राज्यकारभार यांमध्यें पुष्कळ अंतर आहे. इंग्लंडमध्यें लोकांनीं निवडलेले प्रतिनिधि राज्यकारभार चालवितात, प्रतिनिधींनीं बहुमतानें निवडलेलें प्रधानमंडळ ह्मणजे सरकार होय, आणि हें प्रधानमंडळ राजाला जबाबदार नसून पार्लमेंटाला जबाबदार असतें. जर्मनींत राजा नसून बादशहा आहे व बादशहाच्या हातीं सर्व सत्ता एकवटलेली आहे. जर्मनींत राइशस्टाग नांवाची लोकसभा कायदे करण्याकरितां आहे, परंतु अंमलबजावणीचा अधिकार तिला नाहीं. लोकसभेचा अध्यक्ष चान्सेलर लोकसभेला जबाबदार नसून बादशहाला ह्मणजे कैसरला जबाबदार आहे. कैसरचें घराणें आपणांला परमेश्वरानें बादशाही दिली आहे असें मानून

राज्यकारभार चालवितें. या घराण्याचें आडनांव होहेनझोलर्न असें आहे. १८७० सालापर्यंत होहेनझोलर्न घराण्यांतले पुरुष प्रशियाच्या गादीवरच बसत असत व जर्मन संस्थानांपैकीं एका संस्थानाचे राजे एवढेंच त्यांना महत्व असे. पण या सालीं जर्मन संस्थानें आणि फ्रान्स यांच्यामध्यें युद्ध होऊन जर्मन संस्थानांचें मिळून जर्मन साम्राज्य स्थापन झालें व प्रशियाचा राजा हाच जर्मन बादशहा झाला. जर्मन बादशहाला कैसर* असें ह्मणतात. इंग्लंडांतल्या इंग्रज लोकांनीं जसे आपल्या राजाचे अधिकार काढून घेतले तसा प्रकार जर्मनींत झाला नाहीं. जर्मनीचा कैसर समजतो कीं, ईश्वरानें होहेनझोलर्न घराण्याला राज्य चालविण्याचा अधिकार दिला आणि त्यानें मेहेरबानीखातर लोकांना कायदे करण्याकरितां पार्लमेंट दिलें.

जर्मन राज्यकारभाराची ही पद्धत जर्मन लोकांना आवडत नसेल व त्यांचे कैसरबरोबर नेहमीं तंटे बखेडे होत असतील अशी साहजिक कोणाची कल्पना होईल. पण तसा प्रकार बहुधा नाहीं. जर्मनीचा राज्यकारभार वरील पद्धतीनें अद्याप सुरळीत चाललेला आहे. कैसरची सत्ता हिसकावून घेण्यासाठीं तेथील लोकसभेंत समाजसत्तावाद्यांचा वाढता पक्ष

* 'सीझर' या रोमन शब्दाचा 'कैसर' हा जर्मन भाषेंतला व 'झार' हा स्लाविक भाषेंतला अपभ्रंश होय. ह्मणून जर्मनी व आस्ट्रिया देशांच्या बादशहांना कैसर ह्मणतात आणि रशिया व बलगेरिया देशांच्या बादशहांना झार ह्मणतात.

नेटानें प्रयत्न करीत असतो, तरी हा पक्ष तेथें अद्याप सर्वस्वी लोकप्रिय झालेला नाहीं. जर्मन जातीच्याच अंगीं फार प्राचीन काळापासून कोणा तरी पुढाऱ्याच्या तंत्रानें वागण्याचा गुण खिळलेला आहे असें इतिहासकार ह्मणतात. शिवाय होहेनझोलर्न घराण्यांतले राजे साधारणपणें मोठे देशाभिमानी असल्याची परंपरा आहे. हल्लींचा कैसर तर बडा देशभक्त आहे. आपल्या देशाचा, आपल्या घराण्याचा, आपल्या इतिहासाचा, त्याला उत्कट अभिमान आहे. यांतच बहुधा त्याच्या लोकप्रियतेचें इंगित आहे. कैसर अत्यंत मेहनती मनुष्य आहे. आपल्या पितृभूमीच्या (जर्मन लोक स्वदेशाला fatherland ह्मणतात) उत्कर्षासाठीं प्रत्येक जर्मनानें सतत मेहनत केली पाहिजे असा पोकळ उपदेश न करतां स्वतःच्या उदाहरणानें कैसर उपदेश करतो. जर्मन लोक जात्याच मेहनती आहेत. जर्मनीमध्यें आळशी मनुष्य नाहीं, आळस जर्मनी चालूंच देत नाहीं. जर्मनीमध्यें खेळ देखील फारसे नाहींत. इंग्लंडांतले लोक जसे खेळाडू आहेत त्यामानानें तर जर्मनींत मुळींच नाहींत. राष्ट्रावर मोठें संकट आलें असतां देखील ज्याप्रमाणें इंग्लंडांत फूटबालचे सामने चालतात तसें तर जर्मनींत केव्हांच शक्य नाहीं. आपलें राष्ट्र सर्व बाजूंनीं जय्यत करण्याचा कैसरनें सतत उपदेश आणि उद्योग केला आहे.

कैसरला नांवें ठेवण्याची जी अलीकडे प्रवृत्ति दिसून येते

ती चुकीची आहे. त्याला नांवें ठेवून आपणांस प्राप्ति काय होणार? त्याच्या अंगीं गुण अवगुण कोणते आहेत तें निर्विकार बुद्धीनें पाहिलें पाहिजे. त्यानें जर्मन लोकांमध्यें जी देशाभिमानाची ज्योत पेटविली आहे तशी ज्योत पेटविणारा गेल्या शंभर वर्षांत कोणी निघाला नाहीं ही गोष्ट विसरतां कामा नये. त्याच्या अंगीं एक प्रकारची विलक्षण आकर्षक शक्ति आहे. त्याचें शरीर घडधाकट आहे, बुद्धि विशाल आहे, आणि आचरण पवित्र आहे. शरीरानें सशक्त असल्यामुळें तो कामकाज मनस्वी करतो, बुद्धि चांगली असल्यानें हरएक प्रसंगीं सुंदर वक्तृत्व करून त्याचा राजकारणाकडे उपयोग करून घेतो, आणि आचरण पवित्र असल्यामुळें तो लोकांस अधिक आवडतो. त्याच्या अंगीं दुर्गुण ह्मटले ह्मणजे तो लहरी आहे. आपल्या देशभक्तीच्या भरांत एखादे वेळीं बोलूं नये तें बोलतो. कैसरच्या अंगीं करारीपणा आहे हें निराळें सांगावयास नकोच; कारण हा होहेनझोलर्न घराण्याच्या अंगीं खिळलेला आहे. यालाच हटवादीपणाचें स्वरूप येऊन बापलेकामध्यें तंटे झाल्याचीं उदाहरणें या घराण्यांत पुष्कळ आहेत. खुद्द कैसरचें बापाशीं कधीं पटलें नाहीं व तसेंच आतां लेकाचेहि त्याच्याशीं मधून मधून तंटे होतात.

एकंदरींत नेपोलियन बोनापार्टीनंतर आजपर्यंत जगांत जितके राजे झाले त्यांमध्यें नेपोलियनची अगदीं बरोबरी जरी नाहीं तरी त्याच्या धर्तीचा राजा कैसर हा एकटाच होय.

गादीवर आल्यापासून आतांपर्यंत जगांतल्या राजकारणाच्या मोठाल्या प्रश्नांशीं कैसरचा संबंध आलेला आहे. आपल्या आचारानें आणि उच्चारानें त्यानें जगाचें लक्ष अनेक वेळां वेधलें आहे. गेल्या अर्ध्या शतकांत जर्मन साम्राज्याचा उत्कर्ष ही एक अत्यंत महत्वाची गोष्ट घडून आलेली आहे, आणि त्या साम्राज्याचा पंचवीसांहून अधिक वर्षे कैसर हा सूत्रधार आहे. या कारणामुळें आणि कैसरच्या अंगीं नेपोलियनचे गुणावगुण बहुतेक असल्यामुळें कैसरची नेपोलियनसारखीच अवस्था होण्याचा प्रसंग प्राप्त झाला. नेपोलियननें ज्याप्रमाणें सर्व युरोपखंडाचें शत्रुत्व ओढून घेतलें तसेंच कैसरनेंहि घेतलें आहे. नेपोलियनचें उदाहरण डोळ्यापुढें असतांना कैसरनें युद्धांत उडी घातलेली आहे. असल्या मनुष्यांना मागचीं उदाहरणें शहाणपण शिकवूं शकत नाहींत. त्यांच्या मनांत एकदां वेड शिरलें कीं त्या वेडाच्या मागें ते लागलेच. एवढें मात्र खरें कीं नेपोलियनच्या निमित्तानें जसा राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वाचा जन्म झाला, तसा कैसरच्या निमित्तानें त्याच तत्त्वाचा जयजयकार होणार अशी आपण आशा बाळगावी. घोडा मैदान जवळच आहे. आतां राष्ट्रीयत्वाचें तत्त्व कितपत जयजयकार करून घेतें तें लवकरच दिसणार आहे. तूर्त आपण कैसरच्या चरित्राला प्रारंभ करूं.

## प्रकरण २—बालपण आणि तारुण्य.

२७ जानेवारी १८५९ रोजीं सकाळीं बर्लिन येथें युवराज फ्रेडरिक याच्या वाड्यांत कैसर विल्यम याचा जन्म झाला आणि लगेच १०१ तोफांची सलामी होऊन तें वर्तमान लोकांना कळलें. या वेळेला आकाशांत अथवा पृथ्वीवर कोणताहि चमत्कार अथवा अद्भुत गोष्ट घडली नाहीं. कदाचित् तेव्हां ती घडली असें ज्योतिषी यापुढें सांगूं लागतील.

हा काळ जगभर राजकीय धामधुमीचा होता. क्रीमियन युद्ध, हिंदुस्थानांतलें शिपायांचें बंड आणि चीनबरोबर झालेलें युद्ध यामुळें इंग्लंडचें वातावरण लष्करी बनलें होतें. इटली देश फ्रान्सच्या मदतीनें स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ आस्ट्रियाशीं लढत होता, आणि रशिया मध्यआशियामध्यें आपले पाय पसरीत होता. जर्मनीमध्यें पाहिलें तर जर्मन संस्थानांचें अद्याप जर्मन साम्राज्य बनलेलें नसून आस्ट्रियाचा बादशहा हाच जर्मन संघाचा बादशहा समजला जात होता. आस्ट्रियाचें हें वर्चस्व झुगारून प्रशियाच्या राजाला जर्मन बादशहा करण्याचे बिस्मार्कचे बेत चालू होते. परराष्ट्रीय राजकारणांत युरोपांतलीं बडीं राष्ट्रें प्रशियाचा महत्त्व देत नसत. प्रशियाचा राजा चवथा फ्रेडरिक विल्यम याला वेड लागल्यामुळें त्याचा भाऊ प्रिन्स विल्यम त्याचें काम चालवीत होता. हाच हल्लींच्या कैसरचा आजा होय. इटलीनें मिळविलेल्या स्वातंत्र्यामुळें जर्मन संस्थानांचें एकीकरण करून जर्मन साम्राज्य

स्थापण्याची इच्छा जर्मन लोकांमध्यें बळावत चालली होती. प्रागतिक पक्षाचा पुढारी रुडोल्फ फॉं बेनिगसेन याच्या नेतृत्वाखालीं एका मोठ्या राष्ट्रीय मंडळाची फ्रांकफुर्ट येथें स्थापना झाली होती. लष्कराची वाढ करण्याचें धोरण प्रशियाच्या राजानें स्वीकारलें होतें. १८६२ सालीं बिस्मार्कला प्रधानपद मिळून तो या धोरणाचा पुरस्कार करूं लागला. जर्मनीचा प्रसिद्ध आधुनिक तत्त्वज्ञ फ्रेडरिक नीटशे अद्याप तरुण होता. रेलवे नुकतीच पसरूं लागली होती. देशांत उद्योगधंदे सुरू झालेले नसून शेतकीवरच लोक उपजीविका करीत होते. मोठमोठ्या शहरांना देखील अद्याप राकेलच्या दिव्यांचाच उजेड मिळत असे. प्रशियाला आरमार मुळींच नव्हतें. आज बर्लिनची लोकसंख्या ३५ लाख आहे पण तेव्हां पांच लाखांच्या आंत होती, आणि शहरांतल्या मोऱ्यांचें घाण पाणी रस्त्याच्या कडेच्या गटारांतूनच वहात असे. इंग्लंडांतल्या त्या वेळच्या शेतकरी वर्गापेक्षां जर्मनींतला सरदारवर्ग तेव्हां अधिक श्रीमंत नव्हता.

कैसरचा बाप तिसरा फ्रेडरिक हा जर्मनींत लोकप्रिय होता. याची बायको ह्मणजे कैसरची आई एडीलेड विक्टोरिया ही इंग्लंडच्या विक्टोरिया राणीची थोरली मुलगी होय. युवराज फ्रेडरिक याचें राजकीय भानगडींकडे विशेष लक्ष नसे. बापाचे व आईचे गुण कैसरमध्यें आलेले दिसत नाहींत. कैसर आपल्या भाषणांत आपल्या

आजोबाविषयीं आणि आजोबाच्या आईविषयीं जसें प्रेम दाखवितो तसें आईबापांविषयीं दाखवीत नाहीं. आजाच्या कारकीर्दीमध्यें जर्मनीला विलक्षण वैभव प्राप्त झाल्यामुळें त्याला आजाचें कौतुक वाटत असावें. कैसरची आई इंग्लंडवर प्रेम करणारी असल्यामुळें तिच्या वर्तनांत जर्मन रीतीभातींचा, जर्मन भाषेचा तिटकारा दिसून येई. यामुळें जर्मनीमध्यें ती लोकप्रिय नव्हती. या कारणामुळें देखील कैसरला आईचें प्रेम वाटत नसावें.

कैसरला एक भाऊ आणि चार बहिणी आहेत. त्यांतील एक बहीण नुकताच राजीनामा दिलेला ग्रीसचा राजा कान्स्टंटाइन याला दिलेली आहे. भाऊ प्रिन्स हेनरी १८६२ मध्यें जन्मला. त्यानें आरमारी शिक्षण संपादन केलें असून जर्मनीच्या आरमाराचा इन्स्पेक्टर जनरल हा त्याचा हुद्दा आहे. तो राजकारणांत फारसा पडत नाहीं. खेळाचा मात्र त्याला नाद आहे. होहेनझोलर्न घराण्यांतला प्रत्येक मनुष्य कोणत्या ना कोणत्या तरी धंद्याचें शिक्षण घेत असतो. त्याप्रमाणें हेनरीनें बुकें बांधण्याची कला शिकून ठेवली आहे. कैसरचा डावा हात जरासा लांबीला कमी आणि कांहींसा अधू असल्यामुळें आणि शिवाय तो गादीचा वारस असल्यामुळें कोणत्याहि धंद्याचें शिक्षण त्यानें घेतलेलें नाहीं. प्रिन्स हेनरी हा आपल्या थोरल्या भावाशीं नेहमीं अदबीनें वागतो. सार्वजनिक ठिकाणीं आपल्या भावाला Your Majesty

ह्मणजे "राजाधिराज" या पदानें संबोधतो. अगदीं खाजगी ठिकाणीं तेवढा अरे तुरे करतो. कैस[illegible] भावावर प्रेम आहे.

कैसरचा जन्म झाल्याची बातमी कळल्याबरोबर राजवाड्यामध्यें गर्दी जमली. त्या वेळीं कैसरचा आजा परराष्ट्रीय खात्याच्या आफीसांत होता तो बातमी ऐकतां क्षणीं रस्त्यांतली भाड्याची गाडी करून राजवाड्यांत आला. त्याच्या मागोमाग फील्डमार्शल रांगल आला. वाड्याच्या बाहेर जमलेल्या लोकांना त्यानें सांगितलें, छोकरा गुटगुटीत आहे. आपल्याला उत्तम शिपाई मिळाला.

कैसर चार वर्षांचा असतांना आपल्या मामाच्या ह्मणजे इंग्लंडच्या सातव्या एडवर्ड राजाच्या लग्नाकरितां इंग्लंडांत आला होता. यानंतरहि त्याच्या इंग्लंडांत वारंवार खेपा होत असत. 'आइल आफ वाइट' नांवाच्या बेटांत आसबोर्न राजवाड्यांत तो उतरत असे. तेथून समुद्राचा देखावा चांगला दिसत असून जाणाऱ्या येणाऱ्या इंग्रजी लढाऊ गलबतांकडे कैसर कौतुकानें पाही असें सांगतात.

होहेनझोलर्न घराण्यांतल्या मुलांपैकीं ज्यांना राज्यपद मिळावयाचें असतें त्यांचें लहानपणापासून युनिवर्सिटीमध्यें प्रवेश होईपर्यंतचें शिक्षण खाजगी रीतीनें करण्याची वहिवाट आहे. परंतु कैसरच्या आईबापांनीं लहानपणींच त्याला व त्याच्या भावाला क्यासेल नामक ठिकाणीं रहाण्यास पाठ

रून तेथल्या शाळेंत त्यांचीं नांवें घातलीं. या शाळेंत हे दोघे राजपुत्र तीन वर्षें होते. इतर मुलें ज्या बाकांवर बसत त्याच बाकांवर हेहि बसत, इतर मुलांप्रमाणेंच शाळेंतला अभ्यास यांना करावा लागे, व शाळेची शिस्त संभाळावी लागे. शाळेंतल्या विषयांखेरीज इतर विषय शिकविण्याकरितां यांना खाजगी मास्तर असत. शाळेंतल्या इतर मुलांशीं दोघेहि बरोबरीच्या नात्यानें वागत व अभ्यासहि नियमानें करीत. उन्हाळा असो हिंवाळा असो, सकाळीं सहाला उठायचें व अल्पाहार करून आदल्या दिवसाच्या धड्याची उजळणी करावयाची व शाळेंत जावयाचें. शाळा सुटल्यावर आपल्या खाजगी मास्तराबरोबर आसपास सहल करून घरीं फराळ करावयाचा; नंतर घरीं अभ्यास. इंग्रजी व फ्रेंच भाषेचा त्यांना अभ्यास करावा लागे व दोन्ही भाषा कैसरला छानदार येत. रविवारीं घरची मंडळी आणि बडे अधिकारी मुलांच्या समाचाराला येत. इतिहास आणि वाङ्मय हे दोन विषय कैसरचे आवडते होते. १८७७ च्या जानेवारींत या शाळेची परीक्षा पास होऊन कैसर तेथून निघाला. पास झालेल्या १७ मुलांत त्याचा १२ वा नंबर होता. या शाळेंत सद्वर्तनाबद्दल दरसाल तीन मुलांना सोन्याचीं पदकें मिळत त्यांपैकीं एक पदक कैसरनें मिळविलें.

कैसरच्या विद्यार्थीदशेंतली एक गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. ती अशी—कैसरला फ्रेंच भाषा शिकविण्याकरितां

आयमी नांवाचा एक फ्रेंच गृहस्थ मास्तर होता. त्यानें लिहिलें आहे कीं, कैसरला केव्हांहि अभ्यासाच्या बाबतींत अथवा गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा देण्याचा प्रसंग आला नाहीं. त्याचा स्वभाव मानी असल्यामुळें नेमलेले धडे तयार केल्या-वांचून तो रहात नसे. वाचीत असलेल्या पुस्तकांत एखादें सुंदर विचारानें भरलेलें वाक्य आलें कीं त्याचें हृदय उचंब-ळून येई. फ्रेडरिक दि ग्रेटचें चरित्र त्याला फार आवडे. तो विचारी, धोरणी व मेहनती होता. वयाच्या मानानें खेळण्याकडे त्याचें लक्ष नसे. एके दिवशीं या फ्रेंच मास्त-राची आणि कैसरची १८७० सालच्या फ्रान्स व जर्मनी यांच्यामधल्या युद्धासंबंधानें चर्चा चालली होती. साह-जिकपणें दोघेहि आवेशांत आले. कैसरला आपला आवेश न आवरून तो उठून निघून गेला. पण थोड्या दिवसांनीं कैसरनें मास्तराची भेट घेतली व त्याची क्षमा मागून तो ह्मणाला, "झाल्या गोष्टीबद्दल मला दिलगिरी वाटत आहे. तुमचें मन दुखविल्याबद्दल मला वाईट वाटतें. ज्या स्वदे-शभक्तीला मी अत्यंत चहातों त्याच स्वदेशभक्तीबद्दल मी तुमच्यावर रागावलों ह्मणून तर मला फारच खेद वाटत आहे!"

यानंतर पुढील दोन वर्षे कैसरनें बॉन युनिवर्सिटीमध्यें काढलीं. येथें असतांना त्याचें लष्करी शिक्षणहि चालू होतें. युनिवर्सिटीमध्यें कायदा आणि तत्त्वज्ञान या विषयांव-

रील व्याख्यानें तो ऐकत असे. पण कैसरला या विषयांची गोडी नव्हती. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांत विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं.

१८८१ सालीं कैसरचें ड्यूक फ्रेडरिक आफ श्लेसविग-हालस्टीन याच्या मुलीबरोबर लग्न झालें. लग्न झाल्यापासून आजमित्तीपर्यंत कैसरला गृहसौख्य चांगलें लाभलें आहे. नवराबायकोंचें एकमेकांवर प्रेम चांगलें असून दोघांचेहि विचार एक आहेत. राणीला मिरविण्याची हौस नसून आपल्या संसाराची काळजी अधिक आहे. Kaiser, Kinder, Kirche आणि Küche म्हणजे कैसर, मुलें, देऊळ आणि स्वैपाकघर यांखेरीज इतर गोष्टींत ती आपला वेळ घालवीत नाहीं. कैसरला आजमित्तीस सहा मुलगे आणि एक मुलगी आहे.

१८८१ सालापासून १८८८ सालापर्यंत कैसर आपला वेळ लष्करी शिक्षण घेण्यांत आणि राजकारणाची माहिती मिळविण्यांत घालवीत असे. लष्करी शिस्तीप्रमाणें रोजच्या रोज ड्रिल व इतर कामें कैसर नियमानें करी. कोणत्याहि कामांत त्यानें आळस दाखविलेला नाहीं. तरुणपणच्या या लष्करी शिस्तीचा परिणाम त्याच्या शरीरावर अद्यापि दिसून येतो. त्याची चालण्याची व उभें रहाण्याची ढब नेहमीं शिपाईगड्याप्रमाणें असते. बर्लिनपासून थोड्या अंतरावर पॉट्सड्याम नामक ठिकाणीं आपला प्रसिद्ध पूर्वज फ्रेडरिक दि ग्रेट

याच्या राजवाड्यांत कैसर रहात असे. आधींच त्याला फ्रेडरिक दि ग्रेटविषयीं आदर, स्वभावत:च जबर महत्वाकांक्षा, धडधाकट शरीर, प्रशियासारख्या लष्करी देशाच्या लष्करी शिक्षणांत जात असलेला काळ, आणि नुकत्याच झालेल्या जर्मन साम्राज्याच्या स्थापनेनें जर्मनीचा भविष्यकाळ वैभवाचा होणार ही भावना, इत्यादि कारणांच्या समवायानें कैसरची कल्पनाशक्ति भराऱ्या मारीत असावी यांत आश्चर्य तें कोणतें? कैसरचा या वेळीं आपल्या प्रजाजनांशीं संबंध येत नसे. राजाचे बेटे म्हटले म्हणजे या वयामध्यें साधारणपणें तारुण्यावस्थेंतल्या विकारांचे गुलाम बनून तत्संबंधीं भानगडी करीत असावयाचे व यासंबंधानेंच त्यांची लोकांना माहिती व्हावयाची. पण असल्या कोणत्याहि भानगडींत कैसरचें नांव निघालें नाहीं, ही गोष्ट त्याला खरोखर भूषणावह आहे. वर सांगितल्याप्रमाणें आपलें लष्करी काम आणि राजकारणाचें शिक्षण यांतच तो आपला सर्व वेळ खर्च करी.

या वेळीं पहिला विल्यम (प्रशियाचा पांचवा विल्यम) हा जर्मन बादशहा अगदीं म्हातारा झालेला होता. राज्याचीं सूत्रें चान्सेलर या नात्यानें प्रिन्स बिस्मार्क हा चालवीत होता. १८६१ सालीं पहिला विल्यम प्रशियाच्या गादीवर बसला. त्या वेळीं तो पांचवा विल्यम या नांवानें फक्त प्रशियाचाच राजा होता. जर्मन संस्थानाचें तेव्हां साम्राज्य बनलेलें नसून आस्ट्रियाचा बादशहा हाच जर्मन संस्था-

नांचा पुढारी मानण्यांत येत असे. परंतु याच सुमारास बिस्मार्कला प्रशियाच्या मुख्य प्रधानाची जागा मिळाली. प्रारंभीं राजाचा बिस्मार्कच्या कर्तबगारीवर विश्वास नव्हता; नाइलाज ह्मणूनच त्यानें बिस्मार्कला मुख्य प्रधान नेमलें. पण बिस्मार्कनें लष्करी प्रधान रून आणि मुख्य सेनापति मोल्टके यांच्या साह्यानें लवकरच आपली अचाट मुत्सद्देगिरी युरोप खंडाला पटवून दिली, दहा वर्षांच्या आंत डेनमार्क, आस्ट्रिया आणि फ्रान्स यांच्याशीं वेगळालीं युद्धें करून जर्मन संस्थानांचें एकीकरण घडवून आणलें, आणि जर्मन साम्राज्याची स्थापना करून प्रशियाच्या राजाला जर्मन बादशहा या नात्यानें फ्रान्सच्या राजवाड्यांत राज्याभिषेक केला. बिस्मार्कच्या या अलौकिक कामगिरीनें सर्व युरोपखंड दिपून गेलें, मग जर्मन लोकांना व त्यांतल्या त्यांत प्रशियन राजघराण्याला तो प्रिय वाटावा यांत आश्चर्य तें कोणतें? असो. प्राशियाचा पांचवा विल्यम हाच आतां जर्मनीचा पहिला विल्यम झाला. जर्मन बादशहाच्या हातांत सर्व साम्राज्याचीं लष्करी व आरमारी सूत्रें आणि परराष्ट्रीय राजकारणाचा सर्व अधिकार आला. जर्मनीची आतां जगांतल्या बड्या राष्ट्रांत गणना होऊं लागली. फ्रान्सबरोबरचें युद्ध आटपल्यानंतर बिस्मार्क पुन्हां युद्धांच्या भानगडींत पडला नाहीं. युरोपांतल्या राष्ट्रांशीं मुत्सद्देगिरीचे डावपेंच लढवीत कोणालाहि आपल्याविरुद्ध संगनमत करतां येऊं नये अशी

परिस्थिति कायम ठेवीत जर्मन साम्राज्याचें सामर्थ्य वाढवीत तो आतां बसला होता. १८७८ सालीं टर्की व रशिया यांच्या युद्धाचा शेवट झाल्यावर युरोपीय राष्ट्रांतील मुत्स- द्द्यांच्या परिषदेनें त्यालाच अध्यक्ष नेमून बर्लिन येथें तह घडवून आणला. यानंतर १८७९ मध्यें आस्ट्रियाबरोबर तुल्यारिमित्र संधि करून पुढें लवकरच १८८२ मध्यें इटली- लाहि त्यांत ओढलें. याच वेळीं रशियाबरोबरहि त्यानें गुप्त तह केला होता. या सर्व गोष्टी १८७८ नंतर परंतु हल्लींचा कैसर गादीवर येण्याच्या पूर्वी ह्मणजे १८८८ च्या पूर्वी झाल्या. कैसर या सर्व गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण करीत होता. त्याला बिस्मार्कविषयीं आदर वाटत होता यांत शंका नाहीं, कारण बिस्मार्क स्वतःच असें ह्मणतो. तथापि कैसर राजकारणाच्या सर्व बाबींविषयीं स्वतंत्र बुद्धीनें या काळांत विचार करीत असला पाहिजे. ब्रँडेनबर्ग संस्थान होतें तेंच लष्कराच्या जोरावर प्रशियाचें राज्य झालें आणि लष्कराच्याच जोरावर प्रशियाचें राज्य जर्मन साम्राज्य बनलें. त्याचप्रमाणें हें जर्मन साम्राज्य टिकावयाचें असेल तर आपल्या लष्करी सामर्थ्यावरच टिकेल या विचाराचेंहि कैसर ध्यान करीत असला पाहिजे. कारण जर्मनीनें घेतलेले अलसेस व लोरेन हे प्रांत परत मिळविण्याकरितां फ्रान्स टपून बसलेला आहे, रशियाशीं स्नेहभाव असला तरी त्याची शाश्वती नाहीं, आणि आस्ट्रियाशीं गट्टी जमली असली तरी

आपण जर्मन संस्थानांचें पुढारीपण गमावलें ही गोष्ट आस्ट्रिया विसरणार कसा? अशा प्रकारें शेजारच्या तीन बलाढ्य राष्ट्रांच्या कात्रींत आपणांस आपलें नवीन मिळविलेलें वैभव कायम ठेवावयाचें असेल तर लष्कराच्याच जोरावर ठेवणें भाग आहे अशा प्रकारचे कैसरचे विचार या वेळेला ठाम झाले असले पाहिजेत. शिवाय समुद्राकडेहि कैसरचें लक्ष गेलें. जगांतल्या वड्या राष्ट्रांमध्यें मिरविण्यास पाहिजे असेल तर जर्मनीजवळ सैन्याप्रमाणेंच चांगलें आरमार देखील पाहिजे, हेंहि कैसरनें याच काळांत आपल्या मनाशीं निश्चित करून टाकलें. सारांश, गादीवर येण्याच्या अगोदर कैसर आपल्या मनाशीं गादीवर आल्यानंतर करावयाच्या खटाटोपासंबंधानें विचार करीत होता यांत शंका नाहीं असें खुद्द बिस्मार्कनें त्याच्या संबंधानें केलेल्या उल्लेखांवरून दिसून येतें.

कैसरचें लक्ष या वयांत इतकें राजकारणाकडे वळण्याचें आणखी एक कारण होतें. वास्तविक पहातां या वेळीं कैसरचा आजा गादीवर असून त्याच्या मागें गादीवर बसण्यास कैसरचा बाप जीवंत होता. परंतु कैसरचा बाप फ्रेडरिक याला अर्बुद रोगानें (Cancer) पछाडलें असल्यामुळें होहेनझोलर्न घराण्याच्या नियमाप्रमाणें तो कदाचित् गादीवर बसला नसता व कैसरलाच आजाच्या मागें गादी मिळाली असती. फ्रेडरिक हा इंग्लंडच्या विक्टोरिया राणीचा

जांवई. आपल्या मुलीला बादशाहीण होण्याचा योग यावा हें राणीच्या मनांत येणें साहजिक होतें. जर्मन डाक्टरांनीं युवराजाला अर्बुद रोग आहे हें ठरविल्यानंतर विक्टोरिया राणीनें सर मोरेल म्याकेंझी या इंग्लंडांतल्या प्रसिद्ध तज्ज्ञ डाक्टराला युवराजाला तपासण्याकरितां पाठविलें. डा. म्याकेंझीनें युवराजाची तपासणी करून अर्बुदरोग ह्मणण्यासारखा नाहीं असे सर्टिफिकीट दिलें व इंग्लंडांत हवा खाण्यास जाण्याची शिफारस केली. लवकरच व्हिक्टोरिया राणीच्या राज्याची ५० वर्षांची ज्युबिली होती त्या ज्युबिलीच्या समारंभाकरितां जर्मनीचा युवराज आपल्या लेकाला ह्मणजे हल्लींच्या कैसरला बरोबर घेऊन इंग्लंडांत आला व कांहीं महिने तेथें राहिला. पुढें तो युरोपांत आणखी कांहीं हवा खाण्याच्या ठिकाणीं गेला. नंतर पुन्हां एकदां जर्मन डाक्टरांनीं त्याची तपासणी केली व अर्बुद आहे असें ठरविलें. या वेळीं डा. म्याकेंझीनेंहि त्यांच्या ह्मणण्यास रुकार दिला. एवढेंच कीं, अर्बुद असून फ्रेडरिक गादीवर बसण्याला हरकत आली नाहीं. अखेरीस १८८८ च्या मार्च महिन्यांत म्हातारा बादशहा मरण पावला व त्याचा मुलगा फ्रेडरिक बादशहा झाला. या वेळीं त्याचा रोग इतका वाढला होता कीं, त्याला नीट बोलण्याचें देखील सामर्थ्य नव्हतें. गादीचा उपभोग घेण्यास तो वांचला नाहीं. तीन महिने राज्य करून तो त्याच रोगानें मरण पावला, आणि त्याचा मुलगा राजपुत्र विल्यम हा "दुसरा

विल्यम" या नांवानें जर्मन बादशहा झाला. हाच हल्लींचा कैसर होय.

## प्रकरण ३.

## कैसरचें राज्यारोहण आणि बिस्मार्कचा राजीनामा.

कैसर राज्यारूढ झाला तेव्हां अवघा २९ वर्षांचा होता. परंतु तो गादीवर आल्याबरोबर जर्मनीमध्यें खरोखरच नवें राज्य सुरू झालें. बिस्मार्कनें पंचवीस वर्षांहून अधिक काळ-पर्यंत चान्सेलर या नात्यानें राज्याचीं सूत्रें चालविलीं असून या वेळेस तोच चान्सेलर होता. जर्मन साम्राज्य वैभवाला चढविण्यास मुख्यतः कारणीभूत झालेल्या या मुत्सद्द्याबद्दल कैसरच्या मनांत आदरभाव होता. तथापि एका म्यानांत दोन तरवारी राहूं शकत नाहींत हा नियम प्रसिद्ध आहे. कैस-रचेहि स्वतःचे असे कांहीं विचार ठाम झालेले असून त्यांप्र-माणें राज्यकारभार चालविण्याचा त्याचा निश्चय होता. इकडे बिस्मार्कलाहि आपण केवढे थोरले वयोवृद्ध मुत्सद्दी आहों व आपणांपुढें कैसर केवळ पोर आहे असें वाटणें साहजिक होतें. शिवाय साधारणतः असें आढळतें कीं मनुष्य कितीहि बुद्धिमान् असो, तो म्हातारा झाला म्हणजे त्याची बुद्धि म्हातारीच होते. ज्या परिस्थितींत तो वाढलेला असतो त्या परिस्थि-तींत जगाच्या क्रमानुसार घडत आलेला फरक त्याला जरी प्रत्यक्ष दिसत असला तरी त्याची मंद झालेली बुद्धि त्याला मागच्याच परिस्थितींत ओढून नेते. नवीन परिस्थिति, नवे विचार, यांचें आकलन त्याच्या बुद्धीला होत नाहीं. बिस्मा-

र्क तरी या नियमाला अपवाद कोठून असणार? आपल्याच तंत्रानें चालण्यांत कैसरचें आणि जर्मनीचें हित आहे असें त्याला वाटे. त्याच्याबरोबर ज्यांनीं राजकारणासंबंधीं कामें केलीं होतीं ते सर्व निघून गेले असून नवीन प्रधानमंडळ निर्माण झालें होतें. या नवीन लोकांना बिस्मार्कबद्दल आदरभाव बेताचाच होता. आपण झातारे झाल्यावर तरुणांच्या हातांत अधिकार देऊन त्यांना मुत्सद्दी बनवावयाचें आणि जरूरीच्या प्रसंगीं आपण सल्लामसलत द्यावयाची असा मार्ग बिस्मार्कनें स्वीकारणें योग्य झालें असतें. पण तो न स्वीकारतां अखेरपर्यंत अधिकाराची हौस बाळगल्यामुळें या बड्या मुत्सद्द्याचीं शेवटचीं वर्षें मानहानीमध्यें गेलीं. त्याच्याविषयीं चांगला आदर बाळगणाऱ्या कैसरशींच दोन वर्षांत त्याचा बेबनाव झाला.

गादीवर आल्याबरोबर कैसरनें पहिला जाहीरनामा प्रजाजनांस उद्देशून न काढतां सैन्याला उद्देशून काढला. त्यांत तो ह्मणतो—"माझ्या सैनिकांनो, तुह्मी आणि मी एकमेकांकरितां जन्माला आलेले आहों. आनंद असो वा संकट असो, ईश्वरी इच्छेनें जे जे प्रसंग आपणांवर येतील त्या सर्वांत आपण असेच एकमेकांला चिकटून राहूं. माझ्याशीं राजनिष्ठ रहाण्याबद्दलची शपथ तुह्मी आतां लवकरच घ्याल. तेव्हां लक्षांत असूं द्या कीं माझ्या पूर्वजांचे डोळे माझ्याकडे स्वर्गातून पहात आहेत. माझ्या सैन्याच्या कीर्तीचें वर्णन

मला केव्हांना केव्हां तरी त्यांच्यापुढें करावें लागणार आहे." सैन्याला उद्देशून काढलेल्या या जाहीरनाम्यानंतर आरमार, प्रजाजन आणि राइशस्टाग ह्मणजे जर्मन पार्लमेंट यांना उद्देशून एकामागून एक जाहीरनामे निघाले. नंतर लवकरच रशिया, स्वीडन, डेनमार्क, आस्ट्रिया आणि इटाली या देशांच्या राजांकडे कैसर भेटण्यास जाऊन आला. इंग्लंडांत पुढील वर्षी गेला, व त्यानंतर आपल्या बहिणीच्या लग्नाला ग्रीसमध्यें जाऊन तेथून टर्कीची राजधानी कान्स्टांटिनोपल येथें जाऊन आला. रशिया आणि टर्की या देशांमध्यें कैसरनें जाऊं नये अशी बिस्मार्कची इच्छा होती. कारण रशियाशीं स्नेहसंबंध फारसा वाढलेला दाखविल्यानें इंग्लंडला राग येईल, अशी बिस्मार्कची कल्पना होती; आणि टर्कीच्या भानगडींत आपण होतां होईतों पडूं नये ह्मणजे आपणावर युद्धाचा प्रसंग येणार नाहीं, ज्यांचे हितसंबंध टर्कीमध्यें गुंतलेले आहेत त्यांच्यामध्येंच लठ्ठालठ्ठी चालू द्यावी असें बिस्मार्कचें मत होतें. पण दोन्ही गोष्टी कैसरनें ऐकल्या नाहींत.

सोशियालिस्ट ह्मणजे समाजसत्तावादी लोकांच्या चळवळींचें नियमन करणारा एक कायदा बिस्मार्कनें १८७८ सालीं पास करून घेतला असून त्याची मुदत १८९० मध्यें संपणार होती. बिस्मार्कच्या मनांत हा कायदा पुन्हां एकदां कायमचा पास करण्याचा विचार होता. पण कैसरचें मत या बाबतींत भिन्न पडलें. यासंबंधानें थोडासा खुलासा करणें जरूर आहे. युरो-

पांतील इतर देशांप्रमणेंच जर्मनीमध्येंहि समाजसत्तावादी लोक पुष्कळ आहेत. यांच्यांतले जे अत्यंत जहाल त्यांना सोशल डेमोक्रॅट ह्मणतात. गेल्या शतकांत जर्मनीमध्यें मार्क्स या नांवाचा यांचा एक पुढारी होऊन गेला. त्यानें असें प्रतिपादन केलें कीं, जगामध्यें मनुष्य प्राण्याचा सर्व इतिहास आधिभौतिक सुखाच्या लालसेचा परिणाम आहे. सर्व श्रम मजूर लोक करतात आणि त्यांच्या श्रमाला आलेल्या अधिक किंमतीचा फायदा त्यांना न मिळतां ज्यांना 'भांडवलवाले' असें ह्मणतात त्यांना मिळतो. पण भांडवल ह्मणून कोणतीहि स्वतंत्र वस्तु नाहीं. अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणें विशिष्ट गोष्टींना परिस्थिती-मुळें किंमत चढत असते. तशीच मजूरवर्गाच्या मजुरीचीच जी चढलेली किंमत तिचें नांव 'भांडवल.' कारखान्यांत जी जगड्व्याळ यंत्रसामग्री दिसते, इमारती दिसतात, पैशाच्या राशि दिसतात, त्या सर्वांचा अंतर्भाव मजूरांच्या श्रमांतच झाला पाहिजे, 'भांडवल' या शब्दांत होतां कामा नये. अर्थात् हें सर्व भांडवल मजूरांचेंच आहे, तेव्हां त्याचा फायदा त्यांनाच मिळाला पाहिजे. पण होतें आहे उलट. मजूरांच्या श्रमाचेंच उत्पन्न 'भांडवल' या सदरांत मोडलें जाऊन मजूरांच्या पदरांत केवळ जीव जगण्याला अवश्य वस्तूंखेरीज कांहीं पडत नाहीं. तेव्हां मजूरांनीं हें सर्व ज्ञान करून घेऊन सर्व कारखान्यांचींच काय पण राज्यकारभाराचीं देखील सूत्रें आपल्याच हातांत घेतलीं पाहिजेत. आणि अशा प्र-

कारें ज्यांना भांडवलवाले असें ह्मणतात त्या लोकांचा वर्ग नाहींसा केला पाहिजे. अशा प्रकारची मार्क्स याची विचारसरणी होती. या विचारसरणीमुळें त्याला पुढें इंग्लंडांत पळून जावें लागलें, पण जर्मनीमध्यें त्याच्या अनुयायांची संख्या पुष्कळ वाढली व यांनाच सोशल डेमोक्रॅट असें ह्मणतात. सोशियालिस्ट या शब्दामध्यें याहून अधिक लोकांचा अंतर्भाव होतो. समाजामध्यें मजूर वर्गाला हल्लीं जी निकृष्ट स्थिति प्राप्त झालेली आहे ती नाहींशी व्हावी आणि त्यांच्या श्रमानें उत्पन्न होणाऱ्या संपत्तींतून त्यांच्याच सुखाच्या वृद्धीकरितां बराच भाग खर्च व्हावा, व याकरितां सरकारमार्फत कायदे पास करून हळूहळू हें कार्य साध्य करावें, सारांश, समाजामध्यें हल्लीं असलेली विषमता जाऊन समानता यावी असें समाजसत्तावाद्यांचें धोरण आहे. अर्थात् समाजसत्तावाद्यांच्या संबंधानें कैसरसारख्या बादशहाचे विचार कसे असावेत याचें वाचक सहज अनुमान करतील. आपल्या घराण्याला राज्य करण्याची सनद परमेश्वरानें दिलेली आहे, आणि आपण परमेश्वराला जबाबदार आहों, अशी भावना ज्याच्या मनांत कायमचें ठाणें देऊन बसली आहे त्या कैसरला या लोकांना खाऊं का गिळूं असें वाटल्यास त्यांत आश्चर्य काय? बिस्मार्क देखील होहेनझोलर्न घराण्याचा आणि राजसत्तेचा भक्त. अर्थात् त्यानेंहि या लोकांच्या चळवळी हाणून पाडण्याचे उपाय केले. कैसरनें तर हे लोक आपले व आपल्या

राष्ट्राचे शत्रु आहेत असें पुष्कळदां उघड बोलून दाखविलें. पण कैसरचें आणि बिस्मार्कचें या बाबतींत वांकडें येण्याचें कारण असें होतें कीं, बिस्मार्क दडपशाही करूं पहात होता आणि कैसर सहानुभूतीचें धोरण स्वीकारून व मजूरवर्गाला अधिक सुख मिळेल अशा तऱ्हेची खटपट करून त्या वर्गाला आपल्या उपकारांनीं राजनिष्ठ बनवूं पहात होता. तेव्हां या कामीं म्हाताऱ्या मुत्सद्द्यापेक्षां तरण्या मुत्सद्द्याचेंच डोकें अधिक शहाणें ठरलें असें म्हणावें लागतें. लोकसभा कैसरला अनुकूल होती. तिनें बिस्मार्कचें बिल फेटाळून लावलें. प्रधानमंडळाच्या बैठकींत देखील बिस्मार्कची बाजू एका मतानें लंगडी पडली. वास्तविक या प्रसंगीं तरी बिस्मार्कनें राजीनामा द्यावयाचा. पण त्यानें राजीनामा दिला नाहीं.

१८७९ सालीं जर्मनी व आस्ट्रिया यांच्यामध्यें तुल्यारि-मित्र संधि बिस्मार्कनें घडवून आणला होता व १८८२ मध्यें या दोन राष्ट्रांना इटाली सामील झाला. या त्रिराष्ट्रसंधीनें युरोप खंडांत पुष्कळ काळपर्यंत शांतता राखली. रशिया आणि फ्रान्स यांची गट्टी जमूं न देणें हा बिस्मार्कचा डाव होता व तोहि त्यानें रशियाशीं गुप्त तह करून साधला. रशियाच्या तहाची मुदत १८९० मध्यें संपत होती. या तहाच्या बाबतींत कैसर आणि बिस्मार्क यांचा मतभेद झाला. बिस्मार्कचें मत रशियाशीं असलेला तह मुदत संपल्यावर पुन्हां चालू ठेवावा; कैसरनें स्पष्ट सांगितलें कीं, असला तह त्रिराष्ट्रसंधीशीं

विसंगत आहे, हा करण्यांतच आपली चूक झाली, तो चालू ठेवणें ह्मणजे आस्ट्रियाशीं बेइमान होणें आहे, तेव्हां तो आतां रद्दच करावयाचा. याप्रमाणें कैसरनें हा तह मुदत संपतांच रद्द केला.

जर्मनीच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें जर्मन चान्सेलर हा कैसरला जबाबदार आहे व प्रधानमंडळ चान्सेलरला जबाबदार आहे. अर्थात् बादशहाचें व प्रधानांचें कधीं खलबत होत नसे. तें होऊं नये असा १८५२ सालीं एक सरकारी ठरावच झालेला होता. परंतु आपल्याला जरूर वाटेल तेव्हां प्रधानांना बोलावून त्यांच्याशीं खलबतें करण्याचा आपणांस हक्क असला पाहिजे असें कैसरचें ह्मणणें पडलें. बिस्मार्कनें जेव्हां वरील ठरावाकडे बोट दाखवून या गोष्टीला विरोध केला तेव्हां कैसर ह्मणाला, हा ठराव रद्द करून टाका. थोड्या दिवसांनीं क्याथलिक पक्षाचा पार्लमेंटांतला पुढारी विंढार्स्ट याला बिस्मार्कनें आपल्या घरीं बोलावून त्याच्याशीं राज्यप्रकरणीं कांहीं वाटाघाट केल्याचें कैसरला कळल्यावरून कैसरनें बिस्मार्कला निरोप पाठविला कीं, राजकीय गोष्टींची चर्चा करावयाची असेल तेव्हां मला कळवीत जा. बिस्मार्कनें उलट निरोप धाडला, माझ्या घरीं कोणीं यावें आणि काय बोलावें हें ठरविण्याला मी स्वतंत्र आहें. दुसऱ्या दिवशीं कैसर स्वतः बिस्मार्ककडे गेला आणि विंढार्स्ट याजबरोबर कोणत्या विषयांसंबंधानें चर्चा झाली तें त्यानें विचारलें. बिस्मार्क ह्मणाला,

आमचें संभाषण खाजगी होतें. तुमची तशी इच्छा असेल तर माझ्या जागेचा राजीनामा देण्याला मी तयार आहें. ज्या दिवशीं हें बोलणें झालें तो दिवस शनिवारचा होता. दुसऱ्या दिवशीं रविवार हा सुट्टीचा दिवस. सोमवारीं कैसरनें बिस्मार्ककडे राजीनामा मागण्यास आपला मनुष्य पाठविला ! आपण राजीनामा देण्यास तयार आहों असें पाहून हें तरुण पोर बिचकेल अशी बिस्मार्कची कल्पना होती. परंतु राजीनाम्याची मागणी आलेली पाहून त्याला काय वाटलें असेल तें त्याचें त्यासच ठाऊक. तरी बिस्मार्कचा अधिकारलोभ सुटला नाहीं. त्यानें निरोप पाठविला कीं, या प्रसंगीं राजीनामा देण्यानें राष्ट्राला तोंडघशीं पाडल्यासारखें होईल. तुम्हांला मी नकोच असेन तर मला कामावरून दूर करण्याला तुम्ही मुखत्यार आहांत. असा उलट निरोप पाठवून बिस्मार्कनें त्या दिवशीं दुपारीं प्रधानमंडळाची सभा भरविली. पण सभा चालू असतांना "चान्सेलरच्या बाबतींत तुमच्या सल्ल्याची मला जरूर नाहीं" असा प्रधानमंडळाला, आणि "तुमचा राजीनामा अद्याप आला नाहीं याबद्दल बादशहांना आश्चर्य वाटत आहे" असा खुद्द बिस्मार्कला, असे दोन निरोप कैसरकडून आले. बिस्मार्कनें उत्तर कळविलें कीं, "प्रशिया आणि जर्मनी यांच्या इतिहासांत ज्याचें नांव वाखाणलें जात आहे अशा प्रधानाकडून आपण काम कां सोडीत आहों यासंबंधाची खुलासेवार हकीकत जाहीर होणें जरूर असल्यामुळें

राजीनाम्याचा मजकूर तयार होण्यास उशीर लागेल. ही गोष्ट घडल्यानंतर तीन दिवसांनीं बिस्मार्कनें आपला राजीनामा बादशहाकडे पाठवून दिला. बादशहानें तो मंजूर केला व त्याच दिवशीं जनरल फॉं क्याप्रिव्ही याला चान्सेलर नेमलें. बिस्मार्कचा राजीनामा मंजूर करतांना त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल बादशहानें त्याला आभारप्रदर्शक पत्र पाठविलें व 'ड्यूक आफ लौएनबर्ग' ही पदवी देऊन त्याचा गौरव केला. बिस्मार्क नंतर आपल्या फ्रीडरिशश्रू नामक गांवीं जाऊन राहिला. मात्र तेथें गेल्यावर स्वस्थपणें न बसतां कैसर व कैसरचें नवीन प्रधानमंडळ यांजवर 'हॅंबर्ग न्यूज' वर्तमानपत्राच्या द्वारें टीका करण्याचा उद्योग त्यानें चालू ठेवला. यांत त्यानें आपल्या मनाचा क्षुद्रपणा मात्र प्रगट केला. कांहीं काळ हा क्रम चालल्यावर कैसर व बिस्मार्क यांच्या भेटी परतभेटी झाल्या व दोघांचें बाह्यतः सख्य झालें. ता. ३० जुलै १८९८ रोजीं बिस्मार्क मरण पावला.

## प्रकरण ४—जर्मनीची भरभराट.

बिस्मार्कनें राजीनामा दिल्यानंतरचीं दहा वर्षे जर्मन साम्राज्याला भरभराटीचीं गेलीं. एल्ब आणि वेसर या जर्मन नद्यांच्या तोंडाशीं असलेलें हेलिगोल्यांड नांवाचें छोटें बेट इंग्लंडकडून मिळविण्यांत जर्मनीनें पहिला लाट मारला. जर्मन धाडशी लोकांच्या उद्योगानें आफ्रिकेमध्यें झांजिबार आणि त्याच्या शेजारचा मुलूख जर्मनीला मिळाला होता. जर्मनीच्या तोंडाशीं असलेलें हेलिगोल्यांड बेट नेपोलियनच्या युद्धाचे वेळीं इंग्लंडला मिळालेलें होतें. या दोन मुलूखांची १८९० सालीं इंग्लंड व जर्मनी यांनीं अदलाबदल केली. हेलिगोल्यांड बेटाची लांबी १ मैल; रुंदी $\frac{1}{3}$ मैल आणि क्षेत्रफळ $\frac{3}{4}$ मैल आहे. एवढें लहानसें बेट झांजिबारसारख्या प्रचंड मुलूखाशीं अदलाबदल करून जर्मनीनें घेतलें आणि इंग्लंडसारख्या आरमारी राष्ट्रानें दिलें या गोष्टीमध्यें कैसरची मुत्सद्देगिरी आणि इंग्लंडची गैरमुत्सद्देगिरी हीं पुढील इतिहासानें चांगलीं नजरेस आणलीं. हेलिगोल्यांड बेट घेतल्याबरोबर जर्मनीनें तेथें आपल्या आरमाराला उपयोगी असें पुष्कळ बांधकाम करून ठेवलें. त्या वेळेला जर्मनी हें कांहीं आरमारी राष्ट्र नव्हतें, पण आपणांस आरमार वाढविलें पाहिजे याची जाणीव कैसरला होती व त्याप्रमाणें त्यानें लवकरच उद्योग आरंभला. खुद्द बिस्मार्कनें या अदलाबद-

लीबद्दल नापसंती व्यक्त केली. बिस्मार्कच्या हातून जें कार्य व्हावयाचें तें होऊन गेलें होतें. जर्मनीचें एकीकरण त्यानें केलें. परंतु पुढील कार्याला बिस्मार्क नालायक असून कैसरच लायक होता. युरोपांतल्या राष्ट्रांत बिस्मार्कनें जर्मनीचा दर्जा वाढविला, आतां जगामध्यें जर्मनीचें साम्राज्य स्थापन करण्याचा विडा कैसरनें उचलला. १८९६ मध्यें जर्मनींतल्या पुढाऱ्यांना बर्लिन येथील आपल्या राजवाड्यांत मेजवानी देऊन कैसरनें जें भाषण केलें त्यामध्यें पुढील उद्गार काढले— "जर्मन साम्राज्य आतां जगावर पसरलें पाहिजे. आपले हजारों देशबांधव जगांतल्या अगदीं दूरदूरच्या प्रदेशामध्यें देखील जाऊन राहिले आहेत. जर्मन लोक, जर्मन ज्ञान, जर्मन उद्योगधंदे समुद्र ओलांडून सर्वत्र संचार करीत आहेत. लक्षावधि रुपयांचा जर्मन माल समुद्र ओलांडून देशोदेशाची सफर करीत आहे. हें जें जर्मन साम्राज्य जगावर पसरत आहे त्याची आणि आपल्या घरच्या जर्मन साम्राज्याची सांखळी पक्की करण्याचे कामीं मला आतां मदत करणें तुमचें कर्तव्य आहे."

हेलिगोल्यांड बेट मिळाल्यानंतर चार वर्षांत कील कालव्याचें काम पुरें करण्यांत येऊन जर्मन आरमार बाल्टिक समुद्रांतून उत्तर समुद्रांत त्यामधून जा ये करूं लागलें. मागाहून कांहीं वर्षांनीं हा कालवा आणखी खोल खणण्याचें काम सुरू होऊन तें १९१४ सालीं पुरें झालें. आतां कितीहि

मोठें जहाज या कालव्यामधून जाऊं शकतें.

जनरल फॉं काप्रिव्ही हा १८९० च्या मार्च महिन्यापासून १८९४ च्या आक्टोबरपर्यंत चान्सेलर होता. काप्रिव्ही हा मूळचा लष्करी मनुष्य, मुत्सद्दी नव्हे. बिस्मार्कची कर्तबगारी तर याच्या अंगीं मुळींच नव्हती. वास्तविक कैसर आतां स्वतःच चान्सेलर होता ह्मणण्यास हरकत नाहीं. राज्यकारभाराच्या प्रत्येक गोष्टींत कैसर स्वतः लक्ष घालीत असे व त्याच्या संमतीनें सर्व गोष्टी होत असत. काप्रिव्हीचें नांव जर्मनीनें इतर देशांबरोबर व्यापारविषयक तह घडवून आणले त्यांविषयीं इतिहासांत प्रसिद्ध आहे. १८७०–७१ सालीं फ्रान्सबरोबर युद्ध होऊन जो तह झाला त्या तहाअन्वयें, फ्रान्समध्यें अगदीं किमान जकात असेल ती जर्मनीहून येणाऱ्या मालाला लागू करावयाची असें ठरलें होतें. आतां आस्ट्रिया, इटाली, स्वित्झर्लंड, बेलजम, सर्विया, रुमानिया आणि अखेरीस रशिया या देशांबरोबर व्यापारविषयक तह करून जर्मनीनें सवलती प्राप्त करून घेतल्या. या तहांचे योगानें जर्मनीच्या उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें होऊं लागली, व जर्मनीमध्यें तयार होणारा माल सर्व ठिकाणच्या बाजारांमध्यें प्रसार पावूं लागला. आपल्या हिंदुस्थान देशाला देखील Made in Germany या शिक्क्याच्या हरतऱ्हेच्या मालाची चांगली ओळख आहे.

१८९४ सालीं प्रिन्स होहेनलोहे या ७५ वर्षें वयाच्या

सरदाराला चान्सेलरची जागा मिळाली. फ्रान्सकडून घेत-लेल्या अल्सेस–लोरेन प्रांताच्या गवर्नराचें काम यानें पूर्वी केलेलें असून याचा स्वभाव फारच शान्त आणि मनमिळाऊ होता. त्यामुळें आधींच लोकप्रिय असलेल्या या नव्या चान्से-लरच्या कारकीर्दीत जर्मनीचें वैभवहि वाढलें. होहेनलोहे हा सर्वस्वीं आपल्या तंत्रानें चालण्यासारखा मनुष्य आहे हें जाणूनच बहुधा कैसरनें त्याला चान्सेलर नेमला असावा. याच्या कारकीर्दीमध्यें कैसरनें प्रेसिडेंट क्रूगर याला ता. ३ जानेवारी १८९६ रोजीं जी तार पाठविली त्या तारेनें जगाचें लक्ष जर्मनीकडे वेधलें. त्या तारेसंबंधाची हकीकत अशी—

१८८९ सालीं सेसिल ऱ्होड्स नांवाच्या इंग्रज गृहस्थानें 'साउथ आफ्रिका कंपनी' नांवाची कंपनी स्थापून तिला राज्य वाढविण्याची सनद ब्रिटिश सरकाराकडून मिळविली. पुढील सालीं ऱ्होड्स केप कालनीचा मुख्य प्रधान झाला. ऱ्होड्स याच्या मनांत सबंध दक्षिण आफ्रिका ब्रिटिश छत्रा-खालीं आणावयाची होती. या कामीं ट्रान्सवाल आणि आरेंज फ्री स्टेट हीं दोन डच संस्थानें त्याला आड येत होतीं. दक्षिण आफ्रिकेंत इंग्रज आणि डच असे दोन तट होऊन या दोन जातींमध्यें वर्चस्वासाठीं तंटा लागला होता. एका पक्षाचा पुढारी ट्रान्सवालचा अध्यक्ष क्रूगर हा होता व दुसऱ्या ह्मणजे इंग्रज पक्षाचा पुढारी ऱ्होड्स हा होता.

ट्रान्सवालांत डच बोअर लोक इंग्रजांच्या अगोदर जाऊन तेथें त्यांनीं राज्य स्थापलें होतें. पण सन १८८६ मध्यें त्या देशांत सोन्याच्या खाणी सांपडल्याबरोबर इंग्रज, फ्रेंच, जर्मन, इत्यादि युरोपीय लोक ट्रान्सवालांत शिरून पैसा कमावूं लागले. या लोकांना बोअर लोक आउटलँडर ह्मणत व यांना ट्रान्सवालांत राजकीय हक्क त्यांनीं दिले नव्हते. र्‍होड्सनें ट्रान्सवालच्या बाहेर सर्व बाजूंस ब्रिटिश अंमल बसविला होता, व ट्रान्सवालांतले आउटलँडर त्याला सर्व प्रकारें अनुकूल होते. ट्रान्सवाल सरकारकडून आपल्या तक्रारी दूर होत नाहींत असें पाहून आपल्याच हातांत कायदा धरण्याचा बेत या आउटलँडर लोकांनीं कायम केला होता. या कामांत साउथ आफ्रिका कंपनीच्या सैन्याची त्यांनीं मदत मागितली व ती देण्याचें र्‍होड्स यानें कबूल केलें. "जोहानेसबर्ग येथें आउटलँडर लोकांचीं बायकामुलें संकटांत सांपडलीं आहेत याकरितां तुह्मी मदत पाठवा" अशा बनावट मजकूराचें एक पत्र साउथ आफ्रिकन कंपनीच्या सैन्याचा अधिकारी डा. जामेसन यानें आपल्याजवळ घेऊन ठेवून तो ट्रान्सवालच्या पश्चिम सरहद्दीजवळ तयार राहिला, व ता. २९ डिसेंबर १८९५ रोजीं ट्रान्सवालांत शिरला. शिरल्याबरोबर बोअर सैन्यानें त्याला व त्याच्या बरोबरच्या सर्व सैन्याला पकडलें. ही बातमी एकदम सर्व युरोप खंडभर पसरली. जर्मनीमध्यें प्रधानमंडळाच्या सल्ल्यानें कैसरनें ता. ३ जानेवारी १८९६

रोजीं क्रूगरला "शांतताभंग करण्याकरितां तुमच्या देशांत शिरलेल्या सशस्त्र टोळीचा तुह्मी परकी राष्ट्रांकडे मदत न मागतां स्वतःच प्रतिकार केलात याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों" अशा अर्थाची तार पाठविली. या तारेनें इंग्लंड देशांत मोठा गवगवा झाला. कैसरच्या लहरी स्वभावाचें हें एक उदाहरण ह्मणून सांगण्यांत येऊं लागलें. पण कैसरनें ही तार लहरींत पाठविलेली नव्हती. त्यानें प्रधानांशीं खलबत करूनच पाठविली होती. इंग्लंडशीं युद्ध जुंपल्यास तुमच्या वतीनें युद्धांत पडण्याचें धाडस युरोप खंडांत कोणी करणार नाहीं, तुमच्या संबंधानें सहानुभूतीचीं बोलणीं बोलण्यापुरती मदत आह्मी तुह्मांला करूं, असें जर्मनीनें क्रूगरला अगोदर कळविलें होतें. जर्मनीचें यासंबंधाचें पत्र याच वेळीं पोष्टमार्फत ट्रान्सवालांत रवाना होत होतें. पत्र ट्रान्सवालांत पोंचण्याच्या अगोदर जामेसनच्या स्वारीची हकीकत कळली. तेव्हां वरील उत्तरास अनुसरून कैसर, चान्सेलर प्रिन्स होहेनलोहे आणि परराष्ट्रीय प्रधान बायबरस्टीन या तिघांच्या बैठकींत ठरल्याप्रमाणें तार पाठविण्यांत आली होती. मात्र इंग्लंडमध्यें या तारेनें जर्मनीविषयीं साशंकवृत्ति उत्पन्न केली. मॉर्निंग पोस्ट पत्रानें असे उद्गार काढले कीं, "कैसरच्या या तारेकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. इंग्रज लोकांना या तारेचा विसर पडणार नाहीं, परराष्ट्रीय धोरणासंबंधाची जेव्हां जेव्हां चर्चा निघेल तेव्हां तेव्हां

या तारेचा विचार करावा लागेल." सर्व इंग्लंडमध्यें कैसर-विषयीं लोकमत बदललें. कैसर हा लहरी मनुष्य आहे, वाटेल त्या वेळेला वाटेल तें करूं शकेल, असें सर्वांना वाटूं लागलें.

पुढें तीन वर्षांनीं इंग्लंडचें ट्रान्सवालबरोबर युद्ध सुरू झालें. तेव्हां जर्मन लोकमत इंग्लंडविरुद्ध खवळलेलें होतें. त्या वेळीं जर जर्मनीनें इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारलें असतें तर जर्मन लोकांना त्यांत आनंद वाटला असता. परंतु कैसरनें युद्ध पुकारलें नाहीं. उलट पक्षीं ट्रान्सवालचा अध्यक्ष क्रूगर जेव्हां युरोप खंडांत मदत मागण्याच्या आशेनें गेला तेव्हां कैसरनें त्याची भेट घेण्याचें नाकारलें.

कैसर लहानपणीं इंग्लंडांत वरचेवर जात येत असे, व तेव्हांपासून इंग्लंडच्या आरमाराकडे त्याची बारीक नजर असावी असें मागें सांगितलें आहे. आपल्या राष्ट्राला आरमार नाहीं ही उणीव भरून काढण्याच्या तयारीला कैसर लवकरच लागला. त्याचा भाऊ प्रिन्स हेनरी हा आरमारखात्यांत शिरला होता. दोघां भावांनीं जर्मन आरमाराची उभारणी करण्याचे कामीं पुष्कळ श्रम घेतले हें निर्विवाद आहे. गादीवर आल्याबरोबर कैसरनें आरमाराकडे माझें विशेष लक्ष राहील असें जाहीर केलें. लवकरच इंग्रजी पद्धतीचा पोषाख आरमारावरच्या लोकांना देण्याचा त्यानें हुकूम सोडला. देव-ळांमधून प्रार्थना करतांना "आमच्या आरमाराला यश दे"

असें वाक्य प्रार्थनेमध्यें ह्मणण्याचा प्रघात पाडला. आरमारा-च्या खर्चाकरितां अधिक पैसे जर्मन पार्लमेंटाकडून मंजूर होण्यासाठीं कैसरनें आरंभीं प्रयत्न केले पण ते व्यर्थ गेले. नंतर त्यानें 'नेव्ही लीग' ह्मणजे 'आरमारसंघ' नांवाची संस्था स्थापन करून तिच्या मार्फत जर्मन राष्ट्राच्या मनांत आर-माराची अवश्यकता बिंबवून देण्याचा प्रयत्न केला. १८९९ सालीं "Our future lies on the water" असे उद्गार काढून आरमार वाढविण्याचा सपाटा चालविला. यापूर्वी दोन वर्षं जर्मन लोकसभेनें आरमाराची वाढ करण्याला खर्चाची मंजूरी दिली होती. कैसरच्या या उद्गारांपासून आणि आरमारसंघाच्या चळवळीपासून जर्मन राष्ट्राचें लक्ष आरमाराकडे अधिक वेधलें. आपला व्यापार वाढत आहे, त्याच्या संरक्षणाकरितां आपणांपाशीं आरमार चांगलें पाहिजे, असें कैसर आणि त्याचे अनुयायी बोलून दाखवीत. १९०० सालीं जर्मनीनें या बाबतींत आणखी खर्च करण्याचें ठरविलें. आरमाराच्या या कामीं अॅडमिरल फॉ टिरपिझ या गृहस्थाची कैसरला चांगली मदत झाली. टिरपिझ या आरमारी कामगिरीमुळें जर्मनींत फार लोकप्रिय झाला व बिस्मार्कच्या मागें जर्मनींतला अत्यंत मोठा माणूस हाच आहे असें जर्मन ह्मणूं लागले. एवढें मात्र खरें कीं, जर्मनीचें आरमार दहा वीस वर्षांच्या अवधींत इंग्लंडखेरीज जगांतल्या इतर कोणत्याहि एका राष्ट्राच्या आरमाराहून वरचढ झालें.

या काळांतली आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची राहिली. १८९४ मध्यें चीन आणि जपान यांच्यामध्यें युद्ध होऊन जपाननें पोर्ट आर्थर, कियोचौ वगैरे बंदरें तहामध्यें घेतलीं. पण १८९५ सालीं रशिया, जर्मनी आणि फ्रान्स या तिघांनीं जपानला चीनचा मुलूख जापण घेऊं देणार नाहीं अशी तंबी दिली. या तंबीनें जपान घाबरला. पण पुढें १८९७ सालीं कियोचौ येथें दोघां जर्मन मिशनऱ्यांचे खून झाले. त्याबरोबर कैसरनें आपला भाऊ हेनरी याला कांहीं लढाऊ जहाजांसह चीनमध्यें पाठविलें आणि खूनांचा मोबदला ह्मणून कियोचौ व आसपासचा ४०० चौरस मैलांचा मुलूख शंभर वर्षांच्या करारानें चीनपासून मिळविला.

जर्मनीच्या मागोमाग रशिया पुढें सरसावून त्यानें पोर्ट आर्थर आणि फ्रान्सनें क्वांगटू व हैनान हीं मिळविलीं. या शर्यतीमध्यें आपण मागें राहूं नये असें वाटून इंग्लंडनेंहि वी–है–वै बंदर चीनपासून मिळविलें. एकंदरींत या वेळीं चीन देश युरोपीय राष्ट्रांच्या तडाक्यांत सांपडला होता. पण १८९८ सालीं चीनच्या बादशहाच्या आईनें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला व तेव्हांपासून पारडें फिरलें. वरील युरोपीय राष्ट्रांप्रमाणें इटाली देखील आपलें घोडें शिरकावूं लागला तेव्हां त्याला कांहीं प्राप्ति झाली नाहीं. या वेळेपर्यंत युरोपियनांविरुद्ध चीनमध्यें लोकमत खवळून जाऊन सर्व देशभर युरोपियनांच्या, व विशेषतः मिशनरी आणि त्यांनीं बाटविलेले

चीनी लोक यांच्या, कत्तली होऊं लागल्या. बाक्सर या नांवानें प्रसिद्ध झालेल्या गुप्त मंडळीमार्फत हें काम चालू झालें. म्हातारी राणी स्वतःच या बाक्सर चळवळीची सूत्रधार होती. १९०० सालच्या वसंत ऋतूंत ३०००० हून अधिक ख्रिस्ती लोकांना ठार करण्यांत आलें. यांपैकीं ११८ इंग्रज, ७९ अमेरिकन, २५ फ्रेंच आणि ४० इतर राष्ट्रांचे असे अस्सल युरोपियन होते. पेकिनमध्यें असलेल्या सर्व इतर राष्ट्रांच्या वकीलांनीं तेथील परराष्ट्रीय खात्याकडे तक्रारी केल्या पण कांहीं उपयोग होईना. वकील मंडळीच्या आफीसांभोंवतीं बंडवाल्यांचा गराडा पडला. तेव्हां चीनच्या किनाऱ्याशीं असलेल्या परराष्ट्रीय बोटींवरील खलाशांची मदत वकीलांनीं मागितली. २००० खलाशी किनाऱ्यावर उतरून राजधानी-कडे येण्यास निघाले, परंतु बंडवाल्यांनीं रेलवे तोडून टाकल्या-मुळें येऊं शकले नाहींत. इकडे चीनच्या सरकारनें सर्व वकीलांना राजधानींमधून निघून जाण्याचा हुकूम सोडला. जर्मन वकील फॉं केटेलर हा आपल्या वकीलातीमधून चीनच्या परराष्ट्रीय आफीसाकडे जाण्यास निघाला असतां त्याचा बंडवाल्यांनीं रस्त्यांत खून केला. त्याच्या बरोबर गेलेल्या मंडळींतला फक्त एक इसम निसटून ब्रिटिश वकीलातींत बातमी सांगण्यास आला. ब्रिटिश वकीलातीची जागा सर्वांत सुरक्षित असल्यामुळें इतर सर्व राष्ट्रांची वकील मंडळी आपा-पल्या लवाजम्यासह तेथें येऊन राहिली. इतर वकीलातींच्या

इमारतींना बंडवाल्यांनीं आगी लावल्या व ब्रिटिश वकीलातीला वेढा दिला.

फां केटेलर याच्या खूनाची बातमी कळल्याबरोबर सर्व पाश्चात्य राष्ट्रांत भयंकर खळबळ उडाली. अर्थात् कैसर किती संतापला असेल त्याची वाचकांनीं कल्पना करावी. सर्व राष्ट्रांनीं आपापलें सैन्य चीनकडे रवाना केलें. जपाननें १६०००, रशियानें १५०००, इंग्लंडनें ७५००, फ्रान्सनें ५०००, अमेरिकेनें ४०००, जर्मनीनें २५००, इटाली व आस्ट्रिया यांनींहि थोडेंबहुत याप्रमाणें एकंदर पन्नास हजारांहून अधिक सैन्य व १४४ तोफा झटक्यासरशा चीनच्या किनाऱ्यावर उतरल्या. इंग्लंडच्या सैन्यामध्यें हिंदुस्थानांतले शीख शिपाई होते. हे शीख एडन येथें जाण्यास निघाले असतां एकदम चीनमधल्या गडबडीनिमित्त त्यांना तिकडे धाडण्यांत आलें होतें. या सर्व सैन्यानें पेकिनवर मोर्चा फिरवून ब्रिटिश वकीलातीमध्यें कोंडल्या गेलेल्या युरोपियन बायकापुरुषांची ता. १४ आगष्ट रोजीं सुटका केली. ब्रिटिश वकीलातीचा वेढा उठविणाऱ्या या सैन्यांत शीख लोक अघाडीस होते. असो. या ५०००० सैन्याच्या मागोमाग जर्मनीनें आणखी १९००० व फ्रान्सनें आणखी १०००० सैनिक पाठविले. या सर्व संयुक्त सैन्याचें आधिपत्य जर्मन सेनापति फील्डमार्शल काउंट वाल्डरसी याला देण्यांत आलें होतें. या शिस्तवार सैन्यापुढें चीनमधल्या

बाजारबुणग्याचा टिकाव किती लागणार? या सैन्यानें बाक्सर बंड मोडून १३ मे १९०१ रोजीं चीनच्या सरकारबरोबर तह केला. ६६०००००० पौंड खंडणी चीन सरकारनें तीस वर्षांमध्यें सर्व राष्ट्रांना मिळून द्यावी, आणि जर्मनी व जपान (कारण जपानचा वकीलहि बंडवाल्यांनीं मारला होता) यांच्या दरबारीं प्रतिनिधि पाठवून त्यांची जाहीर माफी मागावी असें ठरलें.

वर लिहिल्याप्रमाणें कैसरच्या दरबारीं जाऊन चीनी दरबारच्या वतीनें त्याची माफी मागण्याकरितां चीनच्या बादशहाचा जवळचा नातलग प्रिन्स चून त्याच वर्षी सप्टेंबरमध्यें युरोपांत येऊन बर्लिनकडे येण्यास निघाला. इतक्यांत कैसरनें आपल्या मूर्खपणाचें प्रदर्शन केलें. प्रिन्स चून हा माझ्या दरबारीं आला ह्मणजे त्यानें चीनी दरबारच्या पद्धतीप्रमाणें माझ्यापुढें 'कोटो' ह्मणजे तीन वेळां साष्टांग नमस्कार घालीत आलें पाहिजे असें कैसरनें त्याला कळविलें. ही गोष्ट प्रिन्स चून याला पसंत न पडून तो बासेल या गांवीं आला होता तेथून लवकर बर्लिनकडे जाईना. कैसरच्या या निरोपाची बातमी जाहीर होऊन असल्या मूर्खपणाबद्दल सर्व युरोप खंडभर त्याची छीथू झाली. तेव्हां कैसर थोडक्यांत शहाणा होऊन त्यानें आपला हट्ट सोडला व तीन वेळां लवून मुजरा केला ह्मणजे चालेल असें त्यानें कळविलें. तेव्हां प्रिन्स चून पुढें निघाला. कैसरनें आपल्या पॉट्सड्याम येथील राजवा-

ज्यांत त्याची भेट घेतली. या वेळीं मात्र कैसरचें वर्तन उन्मत्तपणाचें नसून शांतपणाचें होतें. चीनच्या दरबारीं असलेल्या जर्मन वकीलाचा खून झाल्याबद्दल चीनसरकारला खेद होत आहे व याबद्दल चीनसरकारच्या वतीनें आपली माफी मागण्याकरितां मी आलों आहें, याप्रमाणें प्रिन्स चून यानें सांगितलें. तेव्हां त्याला उत्तर ह्मणून कैसरनें जें भाषण केलें त्याचा सारांश असा—

"तुह्मी माझ्या दरबारीं आलांत ते कोणत्याहि आनंददायक कार्याकरितां नसून एका खेदजनक गोष्टीमुळें तुह्मांस यावें लागलें आहे. चीन देशाच्या बादशहाच्या दरबारीं असलेले माझे वकील फ्रीहर फॉ केटलर यांचा तुमच्या देशांतल्या एका सोजरानें वरिष्ठाच्या हुकूमावरून राजधानीमध्यें खून केला. हा अत्याचार सार्वराष्ट्रीय नीतीला आणि कायद्याला सर्वस्वीं विरुद्ध आहे. या अत्याचाराबद्दल तुमच्या बादशहाला अंतःकरणपूर्वक अत्यंत खेद वाटत असल्याचें तुह्मीं आतां मला कळविलें. या अत्याचाराशीं, आणि याच्या मागून चीनमध्यें परराष्ट्रांतील वकीलांच्या व इतर लोकांच्या संबंधानें जे अत्याचार करण्यांत आले त्यांच्याशीं, तुमच्या बादशहाचा संबंध नव्हता असें जें तुह्मीं सांगितलें त्यावर विश्वास ठेवण्यास मला आनंद वाटतो; तथापि याबद्दल तुमच्या बादशहाचे सल्लागार आणि चीनी सरकार यांजकडे यामुळें अधिकच गुन्हेगारी येते. तुमच्या या क्षमा मागण्यानें

आपल्या गुन्ह्यांचें क्षालन झालें व आपणांस क्षमा मिळाली अशी जर त्यांची समजूत असेल तर ती मात्र चुकीची आहे. सुधारलेल्या देशांतल्या लोकांची एकमेकांशीं वागण्याची पद्धत आणि सार्वराष्ट्रीय कायदा यांचें उल्लंघन पुढील काळांत तुह्मी केलें नाहीं तरच या गुन्ह्याचें परिमार्जन होणार आहे. हें लक्षांत आणून पुढें नीट वर्तन ठेवण्याविषयीं जर तुमचे बादशाहा आपल्या हाताखालच्या लोकांस फर्मावितील, तरच त्यांच्या इच्छेप्रमाणें जर्मनी आणि चीन या दोन राष्ट्रांमध्यें पूर्वीप्रमाणें मित्रत्व आणि शांतता नांदेल व तेणेंकरून दोन्ही देशांचें आणि सुधारलेल्या जगाचें कल्याण होणार आहे. याप्रमाणें होईल अशी मी आशा करतों व आपलें स्वागत करतों."

कैसरनें बाक्सर बंडाच्या संबंधानें इतर प्रसंगीं जे उद्गार काढले त्यांवरून त्याला पुष्कळांनीं क्रूर आणि रुधिरप्रिय ठरविला आहे. या आरोपाला पुरावा ह्मणून त्याचे जे उद्गार सांगण्यांत येतात ते उद्गार चीन देशाला सैन्याची रवानगी करतेवेळीं त्यानें काढले होते. ते असे—

"तुह्मांला धूर्त, सुशस्त्र, शूर आणि दुष्ट शत्रूबरोबर लढावयाचें आहे हें लक्षांत ठेवा. जेव्हां शत्रु तुमच्या तावडींत सांपडेल तेव्हां त्याला बिलकूल क्षमा करूं नका [pardon must not be given], शत्रुला कैद करूं नका. तर आपलीं शस्त्रें अशीं चालवा कीं आणखी हजार वर्षें तरी कोणाहि चीनी माणसाला जर्मन माणसाकडे वांकड्या नजरेनें पहाण्या-

ची छाती होऊं नये. मर्दासारखे वागा."

याप्रमाणें कैसरचे उद्गार होते. हे उद्गार कडक खरे, परंतु हे काढण्याच्या अगोदर फक्त दहाच मिनिटें केटेलरच्या खुनाची बातमी कैसरला कळली होती, अर्थात् त्याचें डोकें भणाणून जाणें साहजिक होतें, असें कैसरच्या वतीनें सांगण्यांत येतें.

या प्रकरणामध्यें एका गोष्टीबद्दल मात्र कैसरला अवश्य दोष दिला पाहिजे. चीन देश युरोप खंडाच्या अगोदर सुधारलेला होता हें सर्वांस माहीत आहेच. या देशांत प्राचीन काळीं ग्रहांचे वेध वगैरे घेण्याचीं जीं ज्योतिर्विषयक यंत्रें होतीं तीं कैसरनें पेकिनमधून काढून आपल्या पॉट्सडॅम येथील राजवाड्यांत आणवून ठेवलीं. चीनमध्यें सर्व राष्ट्रांच्या शिपायांना लूट करण्याची पूर्ण मुभा दिलेली होती व त्याप्रमाणें त्यांनीं मनसोक्त लूट केली. तरी कैसरनें चीनी राष्ट्राला भूषणभूत अशा वरील जिनसा आणून आपला बदलौकिक करून घेतला असें ह्मणावें लागतें.

१८९८ सालीं कैसर आपल्या बायकोला बरोबर घेऊन पालेस्टाइन प्रांतांत जाऊन आला. या प्रसंगीं दमास्कस येथें असतांना केलेल्या भाषणांत तो ह्मणाला कीं, "टर्कीचे सुलतान आणि त्यांना खलीफा समजणाऱ्या वीस कोटी मुसलमानांनीं नेहमीं मी त्यांचा मित्र आहें असें समजावें." कैसरनें यापुढें टर्कीशीं बराच स्नेह संपादन केला, टर्कीमध्यें रेलवे करण्याची

परवानगी मिळविली व टर्कीच्या सैन्याची व्यवस्था लावून देण्याकरितां फॉं डर गोल्डझ या प्रसिद्ध जर्मन सेनापतीला पाठविलें.

१९०० सालीं प्रिन्स होहेनलोहे यानें राजीनामा दिला व प्रिन्स ब्यूलो या हुशार मुत्सद्द्याची चान्सेलरच्या जागेवर नेमणूक झाली.

१९०१ सालच्या जानेवारींत इंग्लंडची विक्टोरिया राणी आजारी पडल्यावरून कैसर इंग्लंडांत आला होता. राणीच्या प्रेतयात्रेचे प्रसंगीं आपला मामा सातवा एडवर्ड याच्या बरोबर कैसर असून त्या वेळीं त्याची मुद्रा दुःखयुक्त दिसत होती असें सांगतात.

पुढील महिन्यांत ६ व्या तारखेला कैसर ब्रेमेन शहरीं असतां डीट्रिच वीलंड नांवाच्या एकोणीस वर्षांच्या एका पोरानें त्याच्या तोंडावर एक लोखंडाचा तुकडा फेकला. कैसरला मारण्याचा माथेफिरूनें केलेला आजपर्यंत हा एकच प्रसंग आहे. सदर इसमानें नेम चांगला मारला होता; कारण तो तुकडा कैसरच्या अगदीं डोळ्याजवळ लागला. जखम बरीच होती, तथापि कैसर लवकरच बरा झाला. या खूनाशीं अराजक अथवा समाजसत्तावादी यांचा कांहीं संबंध नव्हता. कारण सदर माणसाला कोणींहि चिथावलेलें नव्हतें. चौकशीअंतीं त्याची वेड्यांच्या इस्पितळांत रवानगी करण्यांत आली.

याच ह्मणजे १९०१ सालीं आगष्ट महिन्यांत कैसरची आई मरण पावली. कैसरला आपल्या आईबापांविषयीं विशेष प्रेम नव्हतें; त्यांतून आईविषयीं तर मुळींच नव्हतें. कैसरची आई इंग्लंडची मोठी अभिमानी होती व ही गोष्ट कैसरला खपत नसे. हीहि नवऱ्याप्रमाणें अर्बुद रोगानें मरण पावली. कदाचित् या रोगामुळें देखील कैसरला आईबापांविषयीं प्रेम नसेल.

१९०२ च्या आरंभीं इंग्लंडचा युवराज ह्मणजे हल्लींचा राजा प्रिन्स जार्ज कैसरच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या भेटीला गेला होता. या वेळीं इंग्लंड व जर्मनी यांच्यामध्यें सख्य होतें. राजपुत्र जार्ज नुकताच अमेरिका वगैरे देशांतून प्रवास करून आला होता त्याचा उल्लेख करून कैसर ह्मणाला कीं, ज्या साम्राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं अशा ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व राजनिष्ठ प्रजाजनांना एक करून साम्राज्य बद्धमूल करण्याचे कामीं आपल्या गोड स्वभावाचा फार उपयोग झाला. याच सालीं दक्षिण अमेरिकेंतील वेनेझुएला देशांतल्या जर्मन, इंग्रज आणि इटालियन व्यापाऱ्यांना त्या देशच्या सरकारानें पैशाच्या बाबतींत त्रास दिल्यामुळें जर्मनी, इंग्लंड आणि इटाली या तीन देशांनीं त्या देशाकडे लढाऊ जहाजें पाठवून दळणवळण बंद केलें व त्या देशाकडून नुकसानभरपाई करून घेतली. याच वर्षी उत्तर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या राज्यांत कैसरनें

आपला भाऊ प्रिन्स हेनरी याला पाठविलें होतें तेथें त्याचा सत्कारहि चांगला झाला. पुढील वर्षी परतभेट ह्मणून अमेरिकन सरकारानें आपल्या जहाजांचा एक काफिला कील बंदरीं पाठविला. त्या ठिकाणीं कैसर गेला असतांना जर्मन, इंग्रज व अमेरिकन अशीं निशाणें एकत्र बांधलेलीं त्याला दिसल्याबरोबर त्यानें तीं घेऊन अमेरिकन ॲडमिरलला उद्देशून पुढील उद्गार काढले--"हें पहा, मी आजपर्यंत सगळा उद्योग चालविला आहे तो एवढ्याकरितां."

ता. ७ नोवेंबर १९०३ रोजीं कैसरच्या घशांत उद्भवलेल्या गांठीवर शस्त्रक्रिया करून ती कापून काढावी लागली. तेव्हां बापाचा रोग बहुधा मुलाला झाला व यांत कैसरचा अंत होणार अशी सर्वांची कल्पना झाली. पण तसा कांहीं प्रकार न होतां आठ दहा दिवसांत कैसर खडखडीत बरा झाला.

१९०४ सालीं इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें सलोखा झाला व याच सालीं जपान व रशिया यांचें युद्ध जुंपलें. इंग्लंड व फ्रान्स यांच्या सलोख्याबद्दल कैसरला भीति वाटणें साहजिक आहे. परंतु 'वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा' या नियमाप्रमाणें कैसरनें या सलोख्याविरुद्ध उघडपणें उद्गार काढले नाहींत. उलट या सलोख्यामुळें जर्मनी व फ्रान्स यांचीहि मैत्री इंग्लंड लवकरच घडवून आणील असें इंग्रज व इतर मुत्सद्दी बोलूं लागले. रूसो-जपानी युद्धामध्यें जर्मनीची तटस्थवृत्ति

होती. युद्ध चालू असतांना कैसरनें आपण मध्यस्थी करण्यास तयार आहों असें दोन्ही राष्ट्रांना कळविलें होतें. १९०५ सालीं पोर्ट आर्थर किल्ला जनरल नोगी यानें घेतल्यावर कैसरनें जनरल नोगी व रशियन किल्लेदार जनरल स्टोसेल या दोघांनाहि शौर्याबद्दल पदक पाठवून त्यांचा गौरव केला.

## प्रकरण ५—मोरोक्को.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत जगामध्यें जीं जीं युद्धें झालीं तीं सर्व एका राष्ट्राचें अमुक एका मुलूखावर स्वामित्व असावें कीं नाहीं हें ठरण्याकरितां झालीं. युद्धामध्यें विजयी होणाऱ्या पक्षाला एका विशिष्ट प्रदेशावर राज्य करावयाला मिळत असे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ही स्थिति पालटली. युरोपखेरीज इतर खंडें जिंकून आपल्या राज्यांत सामील करण्याचा मक्ता सोळाव्या शतकापासून युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांनीं घेतला होता व त्याप्रमाणें त्यांनीं इतर खंडांतील बहुतेक मुलूख व्यापला. अमेरिका खंडांत संयुक्त संस्थानांनीं मात्र इंग्लंडबरोबर युद्ध करून स्वातंत्र्य मिळविलें व हळू हळू अमेरिकेंत सर्वत्र प्रजासत्ताक राज्यें स्थापन झालीं. अमेरिकेखेरीज इतर राहिलेल्या खंडांपैकीं आशियांतला चीन देश कोणाच्या तरी राज्यांत सामील होण्याचा प्रसंग गेल्या शतकाच्या अखेरीस आला होता. पण त्याला खाण्याला सर्वच राष्ट्रें तयार झाल्यामुळें तो कोणालाहि खातां आला नाहीं. चीन देशामध्यें कोणत्याहि एकाचें वर्चस्व न होतां सर्वांना सारख्या सवलती असाव्या असा अखेरीस निर्णय झाला. आजमित्तीस सगळीं राष्ट्रें युद्धांत गुंतलीं आहेत हें पाहून चीन देशावर जपाननें आपलें वर्चस्व लादण्याचा उद्योग जारीनें चालविला आहे ही गोष्ट वेगळी. तथापि

आतां जगामध्यें असलेली सर्व जमीन मोठमोठ्या राष्ट्रांनीं आपसांत विभागून टाकली असल्यामुळें व अर्थात् नवीन मुलूख कोणाला मिळण्याची आशा राहिली नसल्यामुळें, चीन-सारखें कमजोर राष्ट्र आढळलें ह्मणजे त्यावर सर्वांची झडप पडून त्या देशांत व्यापारी अथवा राजकीय सवलती सर्वांना सारख्या मिळाव्या असे ठराव होतात. चीन देशानंतर सर्वांना सारख्या सवलती मिळाव्या हें तत्त्व मोरोक्को देशामध्यें जर्मनीनें स्थापन केलें. एक कमजोर राष्ट्र दुसऱ्या एका बलाढ्य राष्ट्राच्या तावडींत सांपडूं नये व तेथें सर्व बलाढ्य राष्ट्रांच्या लोकांना आंत शिरण्यास दरवाजा सारखा खुला असावा, या तत्त्वाकरितां तिसऱ्या एका बलाढ्य राष्ट्रानें लढाईच्या तयारीनें तयार व्हावें ही गोष्ट मोरोक्को प्रकरणांत प्रथमतः घडली. जर्मनीचा अथवा कैसरचा उद्देश इतका थोर नव्हता हें कोणीहि सांगूं शकेल. तरी कैसरच्या हातून क्षुद्र उद्देशानें कां होईना, मोठें कार्य घडलें खरें. करितां या मोरोक्को प्रकरणाचा खुलासा सविस्तर करणें अवश्य आहे.

१९०४ सालीं इंग्लंड व फ्रान्स या देशांतील मुत्सद्द्यांमध्यें खलबतें होऊन एकमेकांचा तुल्यारिमित्र संधि जरी नाहीं तरी सलोखा (Entante) झाला, हें मागें सांगितलें आहे. हा सलोखा होतांना इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें ज्या बाबींसंबंधानें तंटे होते त्या सर्व बाबींचा दोन्ही पक्षांस समाधानकारक असा निकाल लागणें साहजिक होतें. ईजिप्ट

देशासंबंधानें इंग्लंड आणि फ्रान्स यांचा बरेच वर्षांचा तंटा होता. त्याचा या वेळीं निकाल लागून फ्रान्सनें ईजिप्टमध्यें इंग्लंडच्या वाटेस जावयाचें नाहीं व इंग्लंडनें मोरोक्कोमध्यें फ्रान्सच्या वाटेस जावयाचें नाहीं असें दोघांमध्यें ठरलें. या वेळीं मोरोक्कोमध्यें अंदाधुंदी होती. मोरोक्कोचा सुलतान अबदुल अझीझ हा राज्यकारभार चालविण्यास नालायक होता व त्यामुळें देशांत बंडें चाललीं होतीं. अखेरीस सुलतानानें फ्रान्सकडे मदत मागितली.

इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें झालेल्या सलोख्याचे वेळीं फ्रान्सनें मोरोक्कोसंबंधानें असें धोरण जाहीर केलें होतें कीं, आह्मी मोरोक्कोशीं शत्रुत्व न करतां— ह्मणजे मोरोक्को खालसा न करतां —तो देश व्यापूं व तेथें राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणूं (Pacific penetration and reforms). हें धोरण जाहीर झालें. तेव्हां जर्मन चान्सेलर प्रिन्स फॉं ब्यूलो यानें त्याविषयीं जर्मन पार्लमेंटमध्यें चांगले उद्गार काढले. "इंग्लंड व फ्रान्स या दोन राष्ट्रांनीं वसाहतींच्या बाबतींत आपापसांत समेट केला असें यावरून आह्मांस वाटतें, व यामध्यें आमच्या विरुद्ध कोणाचा कांहीं डाव आहे असें मानण्याचें कारण नाहीं," असें तो ह्मणाला.

पुढील वर्षी ह्मणजे १९०५ सालीं कैसर मोरोक्कोमध्यें जाण्यास निघाला. कैसरचा हा बेत प्रिन्स ब्यूलो यानें लोकसभेंत जाहीर करतेवेळीं असें सांगितलें कीं, मोरोक्कोमध्यें

सर्वस्वीं राजकीय ताबा चालविण्याचा फ्रान्सचा बेत उघड दिसत आहे; अर्थात् असें झाल्यास इतर राष्ट्रांच्या लोकांना मोरोक्कोमधील व्यापारामध्यें व इतर सुधारणांमध्यें हात घालण्यास मज्जाव होईल. हें आपण चालूं देतां कामा नये. आह्मांला मोरोक्कोमधला मुलूख आमच्या राज्यास जोडण्याला नको आहे, व हें कैसरनें गेल्या वर्षीं स्पेनच्या राजाला कळविलें आहे. राज्यविषयक बाब सोडली तरी जर्मनीचे व्यापारविषयक संबंध मोरोक्कोमध्यें आहेत. चीनप्रमाणेंच मोरोक्कोमध्यें सर्व राष्ट्रांना दरवाजा खुला असला पाहिजे. अर्थात् मोरोक्कोला आज जो राजकीय दर्जा आहे तो पालटण्याचा, अथवा त्या देशांत आर्थिक सुधारणा करतांना इतर राष्ट्रांना खुला दरवाजा न ठेवण्याचा, जर कोणाकडून प्रयत्न होऊं लागेल तर त्यामध्यें आमच्या हितसंबंधांना बाध येणार नाहीं अशी खबरदारी घेणें आह्मांस अवश्य आहे. याकरितां पहिलें काम ह्मणजे प्रत्यक्ष सुलतानाशीं आह्मीं बोलणेंचालणें केलें पाहिजे.''

हें बोलणेंचालणें करण्याकरितां कैसर स्वतः निघाला तो वाटेंत लिस्बन येथें पोर्तुगालच्या राजाची भेट घेऊन व जिब्राल्टर बंदरीं चार घटका उतरून ट्यांजीर बंदरीं आला. कैसरच्या या प्रवासानें युरोपांत खळबळ उडाली. कैसरच्या मनांत मोरोक्कोमध्यें कांहीं तरी मुलूख घेऊन भूमध्यसमुद्रांत चंचुप्रवेश करावयाचा आहे असें इतर राष्ट्रांतल्या लोकांना

वाटलें. मोरोक्कोमध्यें जर्मनीचा कांहीं राजकीय संबंध नाहीं, व्यापार अवघा शेंकडा १० आहे, असें असतां हा नवीन उपद्व्याप कोणत्या थरावर जातो इकडे सर्वांचे डोळे लागले. ३१ मार्च १९०५ रोजीं ट्यांजीर येथील जर्मन व्यापाऱ्यांनीं कैसरचें स्वागत केलें तेव्हां कैसरनें पुढील भाषण केलें—"मोरोक्को-मध्यें येणाऱ्या जर्मनांचें पुरोगामित्व पत्करलेल्या तुह्मां लोकांची ओळख करून घेण्यांत मला आनंद होत आहे. तसेंच तुह्मीं आपलें कर्तव्य चोख बजावलें असें तुह्मांस सांगण्याचाहि मला आनंद वाटत आहे. मोरोक्कोमध्यें जर्मनांचे व्यापारविषयक संबंध पुष्कळ आहेत. आपला व्यापार वाढत आहे. हा व्यापार वाढविण्याविषयीं व राखण्याविषयीं, तसेंच येथें सर्व राष्ट्रांना सारखी सवलत मिळण्याविषयीं, मी उद्योग करीन. सुलतानाचा अधिकार आणि मोरोक्कोचें स्वातंत्र्य या दोन गोष्टी अबाधित राहिल्या तरच हें शक्य आहे. या दोन्ही गोष्टी जर्मनी तरी अबाधित ठेवील याविषयीं मी खात्री देतों. मी स्वतः ट्यांजीर येथें आलों हीच गोष्ट याचें प्रत्यक्ष प्रमाण आहे; आणि मोरोक्कोसंबंधानें जर्मनीला जें कांहीं करणें असेल त्याची वाटाघाट आह्मी खुद्द सुलतानाबरोबर करणार हेंहि यावरून सर्वांनीं लक्षांत बाळगावें."

अर्थात् हा इशारा फ्रान्सला उद्देशून होता. कैसरच्या या भाषणानें सुलतानाला जोर येऊन फ्रान्सनें केलेल्या सूचना त्यानें नाकारल्या व थोड्या काळानें, यासंबंधाचा विचार कर-

ण्याकरितां युरोपियन राष्ट्रांची परिषद भरवावी, अशी त्यानें जर्मनीच्या सूचनेवरून युरोपियन राष्ट्रांकडे मागणी केली. या सूचनेला फ्रान्सचा परराष्ट्रीय प्रधान डेलकासे हा कबूल होईना. त्यामुळें जर्मनी व फ्रान्स यांचें युद्ध जुंपण्याचा प्रसंग आला. परंतु युद्ध करण्याची फ्रान्सची तयारी नसल्याकारणानें डेलकासे यानें राजीनामा दिला व नंतर फ्रेंच प्रधानमंडळानें वरील सूचना पसंत केली व युरोपियन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा १९०६ च्या जानेवारीमध्यें अलजेसिरास येथें भरली. दोन वर्षांपूर्वीच फ्रान्स व इंग्लंड यांची जी दोस्ती जमली होती तिचा खरेखोटेपणा या सभेवरून अजमावण्याचाहि जर्मनीचा एक उद्देश ही सभा भरविण्यांत होता. खरोखरच कोण कोणाचा मित्र हें या सभेंत चांगलें निदर्शनास आलें. इंग्लंडनें फ्रान्सची बाजू व आस्ट्रियानें जर्मनीची बाजू उत्तम प्रकारें उचलून धरली. त्रिकूटसंधीमधील तिसरा भागीदार इटाली यानें आपल्या दोघां साथीदारांस जोराचा पाठिंबा दिला नाहीं.

ही सभा भरविण्याचे कामीं जरी जर्मनीला यश आलें तरी सभेनें पास केलेल्या ठरावांनीं जर्मनीचा फायदा झाला नाहीं. (१) मोरोक्कोचा सुलतान हा स्वतंत्र राजा आहे, (२) त्याचें राज्य कायम ठेवलें पाहिजे, आणि (३) त्याच्या राज्यामध्यें आर्थिक सुधारणा करण्याचे कामीं सर्व राष्ट्रांना सारखी मुभा असावी, या तीन तत्त्वांना अनुसरून ठराव करण्यांत आले.

फ्रेंच आणि स्पानिश आफीसरांच्या देखरेखीखालीं सुलतानानें पोलीस खात्याची व्यवस्था ठेवावी, पब्लिक वर्क्स खात्याचीं कंत्राटें देण्याचे कामीं कोणत्याहि एका राष्ट्रांतल्या कंपन्यांना इतरांपेक्षां अधिक सवलती मिळूं नयेत, इत्यादि ठराव झाले. सारांश सर्व राष्ट्रांना सारख्या आर्थिक सवलती व स्पेन आणि फ्रान्स यांचा राजकीय दर्जा अधिक असें सभेनें ठरविलें.

परंतु हें प्रकरण एवढ्यावर थांबलें नाहीं. मोरोक्कोमध्यें अव्यवस्था चालू राहून १९०७ मध्यें कांहीं फ्रेंच लोकांचे खून झाले. लगेच फ्रान्सनें आपलें सैन्य पाठवून मोरोक्कोमधील उडजा प्रांत व्यापला व नुकसानभरपाई झाल्याशिवाय सैन्य उठविण्याचें नाकारलें. तसेंच पुढील सालीं कासाब्लांका शहरीं दंगे होऊन कांहीं फ्रेंच, स्पानिश आणि इटालियन मजूर मारले गेले तेव्हांहि फ्रान्सनें त्या ठिकाणीं सैन्य व आरमार पाठवून शहरावर तोफांचा मारा चालवून शहर ताब्यांत घेतलें. जून १९०८ पर्यंत एकंदर १५००० फ्रेंच सैन्य उतरलें. इतक्या काळापर्यंत देशांत आणखी बंडाळी माजून सुलतान अबदुल अझिझ याचा भाऊ मुले हाफीद यानें गादी बळकावली. या कामीं त्याला जर्मनीची फूस होती. पण त्याला सुलतान ह्मणून कबूल करण्याचें फ्रान्स व स्पेन यांनीं नाकारलें. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, या नवीन सुलतानानें अलजेसिरासचे ठराव मान्य केले पाहिजेत. मुले हाफीद या गोष्टीला कबूल होऊन १९०९ च्या मार्चमध्यें फ्रान्स व

जर्मनी यांचा पुन्हां करारनामा झाला. मोरोक्कोचें राज्य कायम ठेवून तेथें सर्व राष्ट्रांना आर्थिक स्वातंत्र्य ठेवण्याचें फ्रान्सनें कबूल केलें; व मोरोक्कोमध्यें शांतता आणि व्यवस्था राखण्याचा फ्रान्सचा अधिकार जर्मनीनें कबूल करून आपला तेथें फक्त आर्थिक संबंध आहे असें सांगितलें.

१९०९ सालीं झालेल्या या करारनाम्यानें फ्रान्स व जर्मनी यांचा तंटा मिटेल असें वाटलें होतें. परंतु १९११ सालीं पुन्हां हेंच प्रकरण उपस्थित होऊन युद्धाचा प्रसंग आला. मोरोक्कोमध्यें पोलीस ठेवण्याचें काम फ्रान्सकडे सोपविलेलें असल्यामुळें व मोरोक्कोमध्यें शांतता चालू न राहिल्यामुळें फ्रान्सनें आपलें कांहीं सैन्य मोरोक्कोची राजधानी फेझ येथें उतरविलें. याबरोबर जर्मनींत कैसर, चान्सेलर डा. बेथमन-हालवेग आणि परराष्ट्रीय सेक्रेटरी किडरलेन वेक्टर यांची बैठक होऊन या प्रश्नाची चर्चा झाली. ट्यूनिस प्रांताप्रमाणें मोरोक्को खालसा करण्याचा फ्रान्सचा इरादा दिसतो, व फ्रान्सला या बाबतींत इंग्लंडचें पाठबळ असावें, अशी कल्पना करून त्याचा प्रतिकार करण्याचे कामीं आपण आळस करणार नाहीं हें दर्शविण्याकरितां मोरोक्कोच्या अगादीर बंदराच्या किनाऱ्यावर जर्मनीनें आपलें पँथर नांवाचें क्रूझर पाठविलें. मोरोक्कोंतील जर्मनांच्या संरक्षणाकरितां या जहाजाला तेथें जाण्याचा हुकूम दिला असल्याबद्दल जर्मनीनें सर्व राष्ट्रांस कळविलें. जर्मनीच्या या कृत्यानें फ्रान्समध्यें लोकमत खव-

ळलें. १९०९ च्या करारनाम्याशीं हें कृत्य विसंगत आहे असें फ्रान्सचें व इंग्लंडचेंहि ह्मणणें पडून तिन्ही देशांत युद्धाचे ढंग दिसूं लागले. या प्रसंगीं इंग्रज मुत्सद्द्यांनीं फ्रान्सची बाजू संभाळण्याचा आपला निश्चय टांसून सांगितला. जर्मनी आणि इंग्लंड यांमध्यें लवकरच युद्ध होणार अशीं चिन्हें अलीकडे अधिकाधिक स्पष्ट रीतीनें दृग्गोचर होऊं लागलीं होतींच; व याच वेळीं तरवारींचा खणखणाट आणि तोफांचा दणदणाट युरोपांत ऐकूं येणार अशी सर्वांची अटकळ झाली. पण जर्मनीनें माघार खाल्ली. ५ नोवेंबर १९११ रोजीं १९०९ च्या करारनाम्याला पुरवणी ह्मणून दुसरा करारनामा होऊन फ्रान्सला मोरोक्कोमधील सर्व प्रकारची राजकीय सत्ता मिळावी, फक्त सर्व राष्ट्रांच्या आर्थिक हितसंबंधांना खुला दरवाजा असावा, असें जर्मनीनें कबूल केलें व याबद्दल जर्मनीला नुकसानभरपाई ह्मणून फ्रान्सनें मध्यआफ्रिकेतल्या आपल्या कांगो मुलूखांतला एक लक्ष चौरस मैलांचा प्रदेश जर्मनीला दिला. याप्रमाणें अखेरीस मोरोक्को प्रकरण नेमस्तपणानें निकालास लागलें. परंतु दोन्ही देशांतल्या युद्धपक्षी मंडळींचें यानें समाधान झालें नाहीं. जर्मन लोकसभेमध्यें विशेषत: कान्सर्वेटिव पक्षानें या प्रकरणावर खडसून टीका केली. त्यांचा पुढारी हेडेब्रँड याचें सरकारच्या कृत्यावर टीकात्मक भाषण चालू असतां तेथें जर्मनीचा युवराज प्रेक्षकवर्गामध्यें होता त्यानें टाळ्यांचा कडकडाट करून सरकारच्या—अर्थात् बापाच्या—

राजकीय धोरणाबद्दल आपली नापसंती व्यक्त केली. जर प्रसंगीं तुह्मी मागें घेतां तर सैन्यासाठीं व आरमारासाठीं इतका खर्च कां करतां? असें युद्धाचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाचें ह्मणणें होतें. युवराज याच पक्षांत मोडतो, व वरील प्रसंगापासून तर जर्मनींत तो अधिक लोकप्रिय झाला आहे.

## प्रकरण ६—डेली टेलिग्राफ.

१९०८ सालीं कैसरनें एक मोठी भानगड उपस्थित करून सर्व जगभर खळबळ उडवून दिली. तिचा वृत्तांत असा—

इंग्लंड हें युरोपखंडांत सर्वांत बलाढ्य राष्ट्र. इंग्लंडचें आरमार जगड्व्याळ, व्यापार प्रचंड, राज्य मोठें आणि संपत्ति विपुल. हें सर्व ऐश्वर्य दोन चार शतकांच्या मेहनतीनें इंग्लंडनें मिळविलेलें. इंग्लंडच्या मानानें जर्मनी अगदींच नवशिकें राष्ट्र. १८७०–७१ सालीं फ्रान्सबरोबर युद्ध करून जर्मन लोकांचें बिस्मार्कनें राष्ट्र बनविलें. ह्मणजे जर्मन राष्ट्राचा जन्म होऊन अद्याप पुरीं ५० वर्षें देखील झालीं नाहींत. १८७०–७१ सालीं जर्मनीजवळ आरमार नव्हतें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां युरोपाच्या बाहेर जर्मनीच्या वसाहती नव्हत्या, व्यापार नव्हता व साहजिकपणेंच जर्मनीजवळ संपत्तिहि नव्हती. जर्मनीजवळ—अर्थात् प्राशियाजवळ—होतें काय, तर फक्त लष्कर होतें. फ्रेडरिक दि ग्रेटच्या वेळेपासून प्राशियाचें सैन्य युद्धाकरितां सज्ज होतें. या सैन्याच्या जोरावर आणि स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर बिस्मार्कनें आजूबाजूच्या तीन शत्रूंचा पराजय करून जर्मनी हें राष्ट्र बनविलें आणि हळूहळू जर्मनीला वसाहतीहि मिळवून दिल्या. पण आरमार, व्यापार आणि संपत्ति हीं जर्मनीला कैसरच्या कारकीर्दींत

प्राप्त झालीं. कैसर गादीवर आला तेव्हां जर्मनीजवळ आरमार बहुतेक नव्हतें. पण आजमित्तीस जगांतल्या आरमारांमध्यें इंग्लंडच्या आरमाराच्यां खालोखाल जर्मनीच्या आरमाराचा नंबर लागतो, व व्यापारांतहि इंग्लंडच्या खालोखाल जर्मनीचाच नंबर लागेल. कैसरच्या कारकीर्दीचीं वीस वर्षें पुरीं झालीं नाहींत तोंच या राष्ट्रानें इतकी अघाडी मारलेली पाहून इंग्रजांस असें वाटणें साहजिक आहे कीं आमच्याशीं स्पर्धा करण्याकरितां जर्मनीचा सर्व उद्योग चालू आहे. उलट पक्षीं जर्मनांना वाटणें साहजिक आहे कीं आपल्याला जेथें तेथें इंग्रज आडवे येतात. इंग्लंडचे शत्रु जे बोअर लोक त्यांच्या अध्यक्षाला कैसरनें सहानुभूतीची तार पाठविली, इंग्लंड युद्धांत गुंतलेलें पाहून जर्मनी आपलें आरमार सपाट्यानें वाढवूं लागला, इंग्लंडचा मित्र फ्रान्स याच्याबरोबर जर्मनीनें मोरोक्कोसंबंधीं तंटे सुरू केले, इत्यादि प्रकारांवरून इंग्रजांना जर्मनीच्या राजकीय हेतूंबद्दल शंका येऊं लागल्या. कैसर नेहमीं बोले कीं, जगांत शांतता नांदावी ह्मणून माझे सर्व प्रयत्न आहेत आणि तिकडे पहावें तों जर्मन वर्तमानपत्रें बोअर युद्धाचे वेळेपासून इंग्लंडच्या द्वेषानें भरलेले लेख लिहीत आहेत ! सारांश, कैसरच्या कारकीर्दीमध्यें जर्मनी व इंग्लंड यांचें मित्रत्व नाहींसें झालें. १९०८ मध्यें २८ आक्टोबर रोजीं लंडनच्या डेली टेलिग्राफ पत्रांत 'कैसरची मुलाखत या सदराखालीं कांहीं मजकूर प्रसिद्ध होऊन दोन्ही राष्ट्रांत मोठी खळबळ उडाली.

हा मजकूर जरी कैसरची मुलाखत ह्मणून प्रसिद्ध झाला तरी तो एखाद्या गृहस्थानें कैसरची मुलाखत घेऊन लिहिला व प्रसिद्ध केला असा प्रकार नव्हता. कैसर निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या गृहस्थांजवळ जें जें बोलला त्यांतला अवश्यक भाग एका इंग्रज मनुष्यानें एकत्र करून कैसरकडे पाठविला. हा इंग्रज मनुष्य कोण तें अद्याप जगाला कळलें नाहीं. सदर मजकूर कैसरनें वाचला असें जर्मन सरकाराच्या मार्फत प्रसिद्ध झालेलें नाहीं, तथापि कैसरनें हा मजकूर वाचला यांत शंका नाहीं. निदान कैसरकडे पाठविल्यानंतर तो कैसरकडून परत आल्यावर इंग्लंडांत छापला गेला हें खास. सदर मजकुराचा गोषवारा पुढीलप्रमाणें आहे—

"शांतता राखण्यासाठीं मी उत्सुक आहें आणि इंग्लंडशीं मित्रत्वाचें नातें रहावें अशी माझी उत्कट इच्छा आहे. पण तुह्मां वेड्या इंग्रजांना माझा भरंवसा वाटत नाहीं. तुह्मी माझ्याकडे संशयपूर्ण दृष्टीनें बघतां. तुमचीं वर्तमानपत्रें तर मी जणूं काय तुमचा शत्रु आहें असें भासवितात. मी खरोखर इंग्लंडाचा मित्र आहें पण या योगानें तुह्मी माझें काम जास्त बिकट करीत आहां. माझ्या देशांतल्या मध्यम व कनिष्ठ वर्गांतल्या बहुतेक मंडळीला आधींच इंग्लंडविषयीं स्नेहभाव वाटत नाहीं, मी इंग्लंडशीं सख्य करण्याचा सारखा प्रयत्न करीत आहें, आणि तुह्मी तर मला कट्टा शत्रु समजतां. ह्मणून मला तुमचा विशेष राग येतो.

"माझ्या देशांत देखील कांहीं वर्तमानपत्रें युद्धाचा पुरस्कार करणारीं आहेत. पण उपद्यापी लोक हे सर्वत्रच असतात. तुमचीं वर्तमानपत्रें अधिक उपद्यापी का माझीं अधिक उपद्यापी याची तुलना करण्यांत अर्थ नाहीं. पण मी सांगतों, मोरोक्कोच्या प्रकरणांत देखील शांततेला विघातक असें जर्मनीनें कांहीं केलें नाहीं.

"दक्षिण आफ्रिकेंत युद्ध चाललें होतें तेव्हां जर्मन लोकमत इंग्लंडविषयीं प्रतिकूळ होतें ही गोष्ट खरी. पण बोअर लोकांचे प्रतिनिधि युरोपांत मदत मिळण्याच्या आशेनें हिंडत होते तेव्हां त्यांची निराशा कोणीं केली याचें उत्तर माझ्यावर टीका करणारांनीं बरोबर द्यावें. या प्रतिनिधींना फ्रान्स व हालंड या देशांत उत्तेजन मिळालें. बर्लिन येथें जर्मनांनीं त्यांच्या गळ्यांत फुलांचे हार घातले असते. पण मीं त्यांची भेट घेण्याचें नाकारलें. मी जर तुमचा गुप्त शत्रु असतों तर याप्रमाणें वागलों असतों काय?

"बोअर युद्ध ऐन रंगांत आलें होतें त्या वेळीं फ्रान्स आणि रशिया या देशांनीं युद्ध थांबविण्याचे कामीं मदत करण्याबद्दल जर्मनीला विचारलें. पण मीं त्यांना काय उत्तर दिलें? इंग्लंडसारख्या आरमारी राष्ट्रावर सर्व युरोपखंडानें मिळून वजन पाडून तुमच्या म्हणण्याप्रमाणें इंग्लंडची अब्रू धुळीस मिळविण्याचे कामीं जर्मनीची मदत तुम्हांला मिळणार नाहीं.

"जर्मनीचें आरमार वाढत आहे म्हणून तुम्हांला राग येतो.

इंग्लंडच्या विरुद्धच या आरमाराचा रोंख आहे असें तुह्मी ह्मणतां. मी ह्मणतों, जर्मनी हें वाढतें राष्ट्र आहे. जर्मनीचा व्यापार जगभर पसरला आहे. अर्थात् या व्यापाराचें रक्षण करण्याकरितां जर्मनीजवळ बलाढ्य आरमार नको काय? जर्मनीची दृष्टि फार दूर आहे. जपानच्या उदयाकडे पहा, चीनमधल्या राष्ट्रीय जागृतीकडे पहा, आणि पासिफिक महासागरांत काय गुंतागुंती उत्पन्न होतील याचा तर्क करा. ज्या राष्ट्रांपाशीं चांगलें आरमार नसेल त्या राष्ट्रांना पासिफिक महासागरांतल्या गुंतागुंतीच्या प्रश्नांत कोणी विचारणार नाहीं. केवळ एवढी एकच बाब घेतली तरी तिच्याकरितां जर्मनीपाशीं बलाढ्य आरमार असणें जरूर आहे. इंग्लंड आणि जर्मनी अशा प्रसंगीं एक विचारानें बोलूं लागतील आणि तेव्हां जर्मनीचें आरमार बलाढ्य आहे याबद्दल आमच्याप्रमाणेंच इंग्लंडला देखील आनंद वाटेल."

वरील मजकूरावरून कैसर किती बेतालपणाचीं बोलणीं बोलूं शकतो याची वाचकांस कल्पना होईल. रशिया आणि फ्रान्स यांच्याशीं या वेळीं इंग्लंडचा सलोखा झालेला होता. त्या सलोख्यामध्यें वितुष्ट आणण्याच्या उद्देशानें बहुधा बोअर युद्धाच्या वेळीं रशिया व फ्रान्स यांनीं कारस्थान चालविल्याचें कैसरनें सांगितलें असावें असें दिसतें. कारण या मुलाखतीनंतर इंग्लंडचें फ्रान्सशीं अथवा रशियाशीं वितुष्ट मुळींच आलें नाहीं. मी शांततेचा प्रयत्न करीत आहें, आणि

जर्मन लोकमत मला अनुकूल नाहीं, असें जें कैसरनें सांगि-तलें त्या योगानें जर्मनींतले सर्व लोक एकदम खवळून गेले. चान्सेलर प्रिन्स ब्यूलो याजवर जर्मन लोकसभेमधील प्रत्येक पक्षाकडून वरील प्रकरणासंबंधीं प्रश्नांचा वर्षाव झाला व कैसर पुन्हां असला मूर्खपणा (indiscretion) करणार नाहीं अशाबद्दल हमी मागण्यांत आली. प्रिन्स ब्यूलो स्वतः पॉट्स-ड्याम येथें कैसरच्या भेटीला गेला. भेटीचे प्रसंगीं दोघांचें काय बोलणें झालें तें बाहेर आलें नाहीं. पण पुन्हां असला मूर्खपणा आपण करणार नाहीं असें कैसरनें वचन दिलें असलें पाहिजे. कारण ता. १० नोवेंबर रोजीं राइशस्टागमध्यें प्रिन्स ब्यूलो यानें कैसर पुन्हां असल्या प्रकारच्या मुलाखती देणार नाहीं असें सांगितलें. तसेंच आपण एकदम राजीनामा देण्यास तयार झालों होतों परंतु कैसरच्या आग्रहावरून तो बेत रहित केल्याचेंहि त्यानें सांगितलें आणि नंतर डेली टेलिग्राफ-मध्यें प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीस त्यानें उत्तर देण्याचा प्रयत्न केला. वास्तविक हें उत्तर माफीवजा होतें. कैसरच्या या उथळ स्वभावामुळें जर्मनींत लोकसत्तेनें एक पाऊल पुढें टाकलें. प्रधान बादशहाला जबाबदार आहे हा जर्मनीच्या राज्यकारभारांतला सिद्धान्त कैसरच्या या वेळच्या वर्तनानें बद-लून बादशहा प्रधानाला जबाबदार आहे हा सिद्धान्त त्याला मान्य करावा लागला. अद्याप हा सिद्धान्त जर्मनीच्या राज्य-कारभाराच्या नियमावलींत समाविष्ट झाला नसला तरी तो तेथें

अध्याहृतपणें राहिला खरा. कारण त्यानंतर पुन्हां कैसरनें असल्या नाजुक गोष्टींसंबंधानें स्वैर भाषण केलें नाहीं.

## प्रकरण ७– किरकोळ गोष्टी.

जर्मनीच्या राजकारणामध्यें आपण बरेंच पुढें आलों. यामुळें कैसरच्या चरित्रांतल्या मधल्या कांहीं इतर गोष्टी सांगावयाच्या राहिल्या. त्यांकडे आतां आपण वळूं.

१९०५ सालीं कैसरचा मुलगा युवराज फ्रेडरिक विल्यम याचें लग्न झालें. पुढील सालीं कैसरला नातू झाला. त्या वेळीं त्याला फार आनंद झाला. होहेनझोलर्न घराण्याला पुरुषसंतति साधारणत: पुष्कळ असते व याचा कैसरला अभिमानच वाटतो. नातू झाल्याची बातमी कैसरला कळली तेव्हां कैसर प्रवासामध्यें होता. बातमी कळल्याबरोबर तो ह्मणाला, "What? I am a grandfather! Why, that's splendid!" यानंतर १९१४ सालापर्यंत युवराजाला आणखी तीन मुलगे झाले.

कैसरचा कांहीं वर्षें चान्सेलर असलेला प्रिन्स होहेनलोहे यानें लिहिलेल्या आपल्या काळच्या आठवणी त्याच्या मुलानें १९०७ सालीं प्रसिद्ध केल्या. बिस्मार्कनें राजीनामा देण्याच्या वेळची बरीच बारीक माहिती प्रिन्स होहेनलोहे याला खुद्द कैसरच्या तोंडून कळली होती व ती या ग्रंथामध्यें प्रसिद्ध झाली. कैसरला याचा राग आला. मी जीवंत असतां मला न विचारतां माझीं खाजगी संभाषणें प्रसिद्ध करणें अगदीं मूर्खपणाचें आहे, अशी त्यानें प्रिन्स होहेनलोहेच्या

मुलाला तावडतोब तार पाठविली. *

मार्च १९०६ च्या अखेरीस अलजेसिरास येथील बैठक संपली व या बैठकींत आस्ट्रियानें जर्मनीला चांगला पाठिंबा दिला. तेव्हां कैसरनें आस्टियाचा बादशहा फ्रान्सिस जोसेफ याला तार पाठवून त्याचे आभार मानले व कळविलें कीं, "असा प्रसंग पुन्हां आला ह्मणजे मी देखील तुमची बाजू अशीच संभाळीन याविषयीं निर्धास्त असा."

१९०७ च्या नोवेंबरमध्यें कैसर इंग्लंडला गेला होता. तेथें त्यानें केलेल्या भाषणांत पुढील उद्गार होते–

"शांतता राखण्याकरितां माझे सर्व प्रयत्न चालतील असें मीं सोळा वर्षांमागें याच शहरीं बोललों होतों. मीं हाच उद्देश बिनचूक डोळ्यापुढें ठेवून उद्योग केला आहे असें इतिहास सांगेल. तुमच्या व माझ्या देशामध्यें मित्रत्व असणें हा जगांतल्या शांततेचा पाया आहे. हें मित्रत्व कायम ठेव-

* असलें महत्त्वाचें पुस्तक खुद्द जर्मनीमध्यें छापलें असून छापून तयार होण्याच्या अगोदर त्यासंबंधाची कांहीं बातमी कैसरच्या कानावर गेली नाहीं हें आश्चर्य आहे. जर्मनीचें गुप्त-पोलीस-खातें हुशार तरी नसावें हें एक, किंवा आपल्या देशांतल्या छापखान्यांमध्यें कोणकोणतीं पुस्तकें छापलीं जात आहेत याची तीं पुस्तकें प्रसिद्ध होण्याच्या अगोदर बातमी काढण्याचें काम जर्मनींतलें गुप्त-पोलीस-खातें करीत नसावें हें दुसरें, अशीं दोन अनुमानें यावरून निघतात.

ण्याकरितां मी भविष्य काळांत देखील असाच झटेन. माझ्याप्रमाणेंच माझ्या प्रजेची इच्छा आहे.''

राजकारणी माणसांचीं बोलणीं कशा तऱ्हेचीं असतात, त्यांचा शब्दशः अर्थ केला तर त्याची किती किंमत असते, त्याची ज्याला माहिती आहे त्याला कैसरचे वरील शब्द वाचून आश्चर्य वाटणार नाहीं. हे शब्द उच्चारल्यानंतर पुढत्याच वर्षी 'डेली टेलिग्राफ' प्रकरणांतले शब्द कैसरनें काय उच्चारले हें मागील प्रकरणांत सांगितलें आहे, आणि १९१४ च्या आगष्टांत युरोपांत युद्धाला प्रारंभ कसा झाला हें तर आपण जाणतच आहों. कैसरच्या वरील उद्गारांत *तथ्य अगदींच* नाहीं असें मात्र नाहीं. कैसरसारखा बादशहा केव्हांच युद्ध पुकारावयाचा. पण इतके दिवस तरी तो थांबला, एवढ्यापुरता वरील उद्गारांना अर्थ आहे.

*या खेपेला* इंग्लंडमधील आक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें कैसरला एल एल. डी. ही पदवी अर्पण केली. या वेळीं आक्सफर्ड युनिव्हर्सिटीचा चान्सेलर लार्ड कर्झन हा असून युनिव्हर्सिटीच्या सभासदांसह विंडसर राजवाड्यांत जाऊन तेथें त्यानें हा पदवीदानसमारंभ पार पाडला.

१७ फेब्रुवारी १९०८ रोजीं कैसरनें स्वतःच्या हातानें इंग्लंडच्या आरमारखात्यावरील मुख्य अधिकारी लार्ड ट्वीडमाउथ याला लिहिलेल्या पत्रानें युरोपखंडभर गोंधळ उडवून दिला. सदर पत्रांत ब्रिटिश आरमारासंबंधाचा कांहीं मजकूर

होता, आणि त्याच सुमारास ब्रिटिश आरमाराच्या वाढीसंबंधाचें मसुदापत्रक प्रधानमंडळापुढें विचाराकरितां होतें. अशा तऱ्हेचें पत्र आल्याची बातमी लंडनच्या टाइम्सनें प्रसिद्ध करून अशा पत्रव्यवहारावर खरमरीत टीका केली. राष्ट्राचा सुरक्षितपणा ज्या खात्यांवर अवलंबून आहे अशांपैकीं एका खात्यावरच्या मुख्य अधिकाऱ्याकडे गुप्त पत्रव्यवहार करण्यानें सगळ्या राष्ट्राला क्रोध येणें न्याय्य आहे असें टाइम्सनें लिहिलें. टाइम्सने ही बातमी फोडल्याबरोबर युरोपखंडांत सर्वत्र या पत्राची चर्चा सुरू झाली. हें पत्र त्यावेळीं अथवा त्यानंतर अद्यापपर्यंत प्रसिद्ध झालें नाहीं. पार्लमेंटमध्यें मुख्य प्रधान आस्क्विथ यानें खुलासा केला कीं, "सदर पत्र खाजगी असून मित्रत्वाच्या नात्यानें लिहिलेलें आहे. तें प्रधानमंडळापुढें चर्चेकरितां मांडण्यांत आलें नव्हतें, इतकेंच नव्हे तर तें पत्र येण्यापूर्वीच आमचा आरमारवाढीचा मसुदा तयार झालेला होता." आस्क्विथच्या खुलाशानंतर लार्डांच्या सभेमध्यें लार्ड ट्वीडमाउथ यानें खुलासा केला कीं, "मला तें पत्र सरळ मार्गानें ह्मणजे पोष्टमार्फत आलें होतें; त्याचें धोरण मित्रत्वाचें होतें; सदर पत्र मीं परराष्ट्रीय प्रधान सर एडवर्ड ग्रे यांना दाखविलें होतें व त्यांनींहि तें पत्र खाजगी असें समजण्याचाच सल्ला मला दिला." इंग्रजी पार्लमेंटांत अशा प्रकारें सदर पत्राच्या योगानें जर्मनीविषयीं द्वेषभाव व्यक्त झाला नाहीं याबद्दल जर्मन लोकांनीं समाधान व्यक्त केलें, पण टाइम्सनें पत्र

उघडकीस आणल्यामुळें टाइम्सवर जर्मनांचा रोष झाला.

१९०९ मध्यें चान्सेलर प्रिन्स फां ब्यूलो यानें राजीनामा दिला व त्याच्या जागीं डा. हर फां बेथमन-हालवेग याची नेमणूक झाली. प्रिन्स ब्यूलो हा सुमारें दहा वर्षे चान्सेलर होता व बिस्मार्कच्या खालोखाल या माणसानें आपली मुत्सद्देगिरी चांगली दाखविली. सांप्रतचें युद्ध सुरू झाल्यानंतर इटाली संयुक्तांस मिळूं नये अशा खटपटीकरितां याला जर्मनीचा इटालीमधील वकील नेमलें होतें, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. हर फां बेथमन-हालवेग हा १९१७ पर्यंत चान्सेलरचें काम करीत होता. आतां त्याच्या जागीं डा. मायकेलिस याची नेमणूक झाली आहे.

या सालाच्या ह्मणजे १९०९ च्या फेब्रुवारीमध्यें कैसरचा मामा इंग्लंडचा राजा सातवा एडवर्ड बर्लिन येथें गेला होता. पुढील सालीं एडवर्डच्या श्मशानयात्रेसाठीं कैसर लंडनला आला होता. या प्रसंगीं महाराणी अलेक्झांड्रा व जार्ज राजा यांच्याशीं कैसरचें वर्तन मोठ्या प्रेमाचें होतें असें इंग्रजी वर्तमानपत्रांतून वर्णन आलें. याच सालीं जर्मनीचा क्राउन प्रिन्स ह्मणजे युवराज हिंदुस्थानांत प्रवासाला येऊन गेला.

कैसरनें १९१० च्या सप्टेंबरमध्यें आपला दोस्त आस्ट्रियाचा बादशहा फ्रान्सिस जोसेफ याची भेट घेतली. मोरोक्को प्रकरणांत आस्ट्रियानें जशी जर्मनीची पाठ राखली तशीच १९०८ सालीं बोसनिया-हर्झेगोविना प्रकरणांत कैसरनें आ-

स्ट्रियाला मदत केली. १८७८ सालीं बर्लिन येथें तह होऊन रशिया आणि टर्की यांच्यामधील युद्ध संपलें तेव्हां टर्कीचे बोसनिया आणि हर्झेगोविना हे प्रांत दंगेधोपे मोडून व्यवस्थित राज्यकारभार चालू करण्याकरितां सर्व युरोपियन राष्ट्रांच्या संमतीनें आस्ट्रियाच्या हवालीं करण्यांत आले. हे टर्कीचे प्रांत आस्ट्रियाच्या अंमलाखालीं किती दिवस रहावे याच्या कांहीं निर्बंध नव्हता. १९०८ सालीं टर्कीमध्यें 'तरुण तुर्क पक्षानें राज्यक्रांति करून सुलतानाला पदच्युत केलें व ही संधी साधून आस्ट्रियानें बोसनिया व हर्झेगोनिना हे प्रांत आपल्या राज्यास जोडल्याचें जाहीर केलें. या कामीं जर्मनीचें पूर्ण साहाय्य आस्ट्रियाला होतें. बोसानिया व हर्झेगोविना या प्रांतांत स्लाव लोकांची पुष्कळ वस्ती आहे. अर्थात् या प्रांतांकडे सर्वियाची नजर होती. हे प्रांत आपल्या राज्याला मिळून 'मोठा सर्विया' हें नांव सर्वियाला मिळेल व नंतर आपल्या राष्ट्रीय गुणांचा विकास आपण करूं शकूं अशी आशा सार्वियन देशभक्त बाळगीत होते. आस्ट्रियानें हे प्रांत खालसा केल्याबरोबर स्लाव जातीचा पुढारी रशिया चिडून जाऊन त्यानें आस्ट्रियाबरोबर युद्धाची तयारी केली. या वेळीं कैसरनें रशियाला स्पष्ट शब्दांनीं बजाविलें कीं, आस्ट्रिया आमचा दोस्त आहे, त्याच्याबरोबर युद्ध करणें ह्मणजे जर्मनीबरोबर युद्ध करणें होय. या धमकावणीनें रशियानें त्या वेळेला माघार खाल्ली. अर्थात् आतां जर्मनी आणि आस्ट्रिया यांची दोस्ती पक्की

झाली होती. कैसर व्हिएन्ना येथें गेला तेव्हां त्याचें आदरातिथ्य उत्तम झालें, व कैसरनें या दोस्तीचा आपल्या भाषणांत उल्लेख केला.

१९११ सालीं मे महिन्यांत लंडन शहरीं विक्टोरिया महाराणीचा पुतळा उघडण्याचा समारंभ झाला. तेव्हां कैसर तेथें गेला होता. कैसर जेव्हां इंग्लंडमध्यें येई तेव्हां इंग्लंडविषयीं स्नेहभावाचे उद्गार काढीत असे. पण या खेपेला त्यानें आपल्याबरोबर आणलेल्या लवाजम्यांत स्टीनहौएर नांवाचा प्रख्यात जर्मन हेर होता. कैसरच्या लवाजम्याबरोबर आल्यामुळें शेंकडों बड्या इंग्रजांशीं बोलण्याचालण्याचे प्रसंग त्याला आले असतील हें उघड आहे. त्या वेळीं हा हेर आहे असें कोणाला समजलें नाहीं. परंतु असल्या मनुष्याला आपल्या बरोबर आणण्याचें कैसरचें हें कृत्य हलकटपणाचें होय.

१९१४ सालीं आगष्टांत महायुद्धाचा वणवा पेटल्यापासून कैसरची खाजगी माहिती आपणास कळणें शक्य नाहीं. युद्ध सुरू झाल्यापासून कैसर आपल्या घराण्याच्या पद्धतीप्रमाणें बहुधा कोणत्या तरी रणांगणावर असतो. या काळांत त्याच्या चेहऱ्यावर म्हातारपणाचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत असें म्हणतात.

---

## कैसरची व्यक्तिविषयक माहिती.

कैसर शरीरानें व बुद्धीनें धडधाकट आहे. त्याचा डावा हात मात्र लांबीला कांहीं कमी असून अधू आहे. अंगांतला पोषाख काढतांना त्याच्या नोकरांना डावा हात न दुखविण्याबद्दल खबरदारी घ्यावी लागते. तथापि औषधें वगैरे लावून त्यानें डाव्या हातांत कामापुरती ताकद राखली आहे. कैसर दोन वर्षांचा असतांना त्याची आई एके दिवशीं घोड्यावर बसून चालली असतां तिच्या हातांतून कैसर खालीं पडला तेव्हां त्याच्या डाव्या हाताला इजा झाली असें ह्मणतात. डाव्या कानामध्येंहि कांहीं तरी रोग असून मधून मधून त्यापासून कैसरला पीडा होते. कैसरची उंची ५ फूट ८ इंच आहे. कैसर नेहमीं लष्करी पोषाख करतो ह्मटलें तरी चालेल. साधा पोषाख अगदीं क्वचित् करतो. कैसरचे डोळे पोलादी रंगाचे असून विलक्षण पाणीदार आहेत.

कैसरची बुद्धि तीक्ष्ण आहे. बुद्धीचें सामर्थ्य विलक्षण नसलें तरी तीक्ष्णपणा विलक्षण आहे. तो जेथें जाईल तेथें त्याची दृष्टि अगदीं बारीकसारीक गोष्टी देखील चटकन लक्षांत घेते. कोणत्याहि विषयाची वाटाघाट असो, त्यांतले मुख्य मुद्दे त्याच्या नेमके लक्षांत येतात. त्याच्याशीं संभाषण करण्यास जाणारा मनुष्य चांगला विद्वान् असेल तरच टिकेल. काम अतिशय करणें व तेंहि झपाझप करणें त्याच्या अंगवळणीं

पडलेलें आहे. त्याच्याइतकें काम करणारा सगळ्या जर्मनीमध्यें दुसरा कोणी नसेल. कैसर रात्रीं थोडें जेवून लवकर निजतो व सकाळीं लवकर उठतो. मादक पेयें अगदीं थोडीं पितो, धूम्रपानहि थोडें करतो. त्याला प्रवासाचा फार नाद आहे. आगाऊ सूचना न देतां अकस्मात् कोठें तरी जाऊन दत्त ह्मणून उभें रहाण्याची त्याची पद्धत आहे. चित्रकलेचा नाद त्याला बराच आहे. आपल्या घराण्याचा व आपल्या पूर्वजांचा त्याला मोठा अभिमान वाटतो. आपल्या घराण्याला ईश्वरानें राज्य करण्याची सनद दिली आहे अशी एक वेडगळ कल्पना कैसरच्या डोक्यांत भरलेली असून तिचा उच्चार तो वारंवार आपल्या भाषणांत करतो. तो जें बोलतो तसें खरोखरच त्याला वाटतें. शिवाय तो नेहमींच अगदीं मोकळ्या मनानें बोलतो. वक्तृत्वकला त्याला चांगली साधलेली आहे. बोलणारा चांगला, इच्छाशक्ति दांडगी आणि काम करण्याची ताकद व हौसहि विलक्षण, असे गुण एकवटल्यामुळें हरहमेश लोकांशीं त्याचा संबंध येतो. यामुळें जर्मनींत तो लोकप्रिय असून, इंग्लंडांत जसा लाइड जार्ज त्याप्रमाणें जर्मनींत सर्व लोकांच्या बोलण्याचालण्याचा कैसर हा नेहमीं विषय होऊन बसला आहे.

उद्योगप्रिय माणसांना छानछोकीची हौस नसते असा नियम आहे, व त्याप्रमाणें कैसरची वागणूक आहे. त्याच्या बसण्याउठण्याच्या खोल्यांमध्यें श्रीमंतीचा डौल

दाखविणारें सामान नाहीं. तो स्वतः साध्या माणसाप्रमाणें वागतो. कैसरचें सरकारी उत्पन्न दरसाल सव्वा कोटी रुपयांचें असून त्याच्या घराण्याची एकंदर इष्टेट ३०० कोटी रुपयांची भरेल. त्यानें आपल्या मुलांचीं लग्नें श्रीमंत मुलींबरोबर लावलीं आहेत.

जर्मनीची राजधानी बर्लिन येथें 'जुना राजवाडा' असून बर्लिनमध्यें रहाण्याचें कारण असेल तेव्हां कैसर तेथें रहातो. या राजवाड्याला 'स्क्लॉस' असें नांव आहे. परंतु कैसरचें खरें रहाण्याचें ठिकाण पॉट्सड्याम शहर असून तें बर्लिनपासून १६ मैल अंतरावर आहे. बर्लिनपासून पॉट्सड्यामपर्यंत रेलवे आहे, तथापि मोटारी सुरू झाल्यापासून कैसर आगगाडीचा उपयोग क्वचित् करतो. पॉट्सड्याम येथें नवा राजवाडा, सान्ससूसी, संगमरवरी राजवाडा, इत्यादि पांच सात राजवाडे आहेत. त्यांपैकीं 'नवा राजवाडा' येथें कैसर रहातो. हा राजवाडा आतां बराच जुना झाला आहे. कारण फ्रेडरिक दि ग्रेट यानें १७६९ सालीं हा बांधला.

कैसरच्या अंगीं असलेल्या गुणावगुणांवरून त्याला The Route Kaiser ह्मणजे भटकणारा कैसर, William the sudden ह्मणजे अकस्मात् प्रकट होणारा कैसर, आणि the indiscreet Kaiser ह्मणजे अविचारी कैसर, अशीं तीन टोपणनांवें मिळालीं आहेत.

## कैसरचे कांहीं उद्गार.

कैसर हा बरेच प्रसंगीं भाषणें करतो असें मागें सांगितलें आहे. त्याच्या भाषणांवरून त्याच्या स्वभावाचें चित्र डोळ्या-पुढें उभें राहील. त्याच्या भाषणांतले कांहीं निवडक उद्गार येथें देतों---

"परमेश्वराच्या प्रेरणेनें एखाद्या राज्याचा कारभार चालला असेल तर तो अलीकडे चाललेला जर्मनीचा राज्यकारभार होय."

"मी तुमचा बादशहा व राज्यकर्ता ज्याप्रमाणें आपल्या सर्व इच्छा आणि क्रिया स्वदेशाचे कामीं लावतों त्याप्रमाणें तुह्मी आपलें सर्व आयुष्य माझ्याकरितां खर्ची घातलें पाहिजे."

"माझ्या राज्यामध्यें मी मालक आहें, दुसऱ्याची मालकी मी चालूं देणार नाहीं."

"माझ्या कार्याला जे विघ्न करतील त्यांना मी चिरडून टाकीन."

"आपला भविष्यकाळ समुद्रावर आहे. माझें सैन्य आज ज्या दर्जाचें आहे तितका दर्जा माझ्या आरमाराला मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाहीं."

"समाजसत्तावादी लोक हे धर्माचे आणि राष्ट्राचे शत्रु आहेत."

"आपलें साम्राज्य कसें टिकवावयाचें याचें विद्यार्थांना शिक्षण देणें हा शाळांचा उद्देश असला पाहिजे. आमच्या शाळांमधून देशभक्त जर्मन तयार झाले पाहिजेत."

"आह्मी जर्मन लोक एका ईश्वराखेरीज दुसऱ्या कोणाला-हि जगांत भीत नाहीं."

---

## कैसरच्या आयुष्यांतील मुख्य गोष्टींची जंत्री.

१८५९ जानेवारी २७ कैसरचा जन्म.

१८६१ कैसरचा आजा प्रशियाच्या गादीवर बसला.

१८६२ बिस्मार्क प्रशियाचा मुख्य प्रधान झाला. कैसरचा भाऊ प्रिन्स हेनरी याचा जन्म.

१८६४ प्रशियानें डेनमार्कबरोबर युद्ध करून श्लेसविग व होल्सटीन हे परगणे मिळविले.

१८६६ प्रशियानें आस्ट्रियाचा पराभव केला.

१८७०-७१ प्रशियाचें व इतर जर्मन संस्थानांचें फ्रान्सबरोबर युद्ध.

१८७१ फ्रान्सबरोबर तह होऊन अल्सेस व लोरेन प्रांत आणि २० कोटी पौंड खंडणी जर्मनीला मिळते. जर्मन संस्थानांचें एकीकरण, जर्मन साम्राज्याची स्थापना, आणि प्रशियाच्या राजाला कैसर विल्यम (पहिला) या नांवानें जर्मन बादशहा या नात्यानें व्हर्सेलिस येथील फ्रेंच राजवाड्यांत राज्याभिषेक.

१८७४-१८७७ कैसरचा क्यासेल येथें विद्याभ्यास.

१८७७-१८७८ रशिया व टर्की यांचें युद्ध आणि बर्लिन येथें तह.

१८७९ जर्मनी व आस्ट्रिया यांचा संधि.

१८८१ कैसरचें लग्न.

१८८२ कैसरचा थोरला मुलगा क्राऊन प्रिन्स फ्रेडरिक विल्यम याचा जन्म. जर्मनी, आस्ट्रिया व इटाली यांचा तुल्यारिमित्र संधि.

१८८३ कैसरचा दुसरा मुलगा ईटेल फ्रेडरिक याचा जन्म.

१८८४ आफ्रिकेमध्यें टोगोल्यांड, कामेरून आणि जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका जर्मनीला मिळालीं. कैसरचा तिसरा मुलगा अडलबर्ट याचा जन्म.

१८८७ कैसरचा बाप अर्बुद रोगानें अत्यवस्थ. कैसरचा चवथा मुलगा आगस्ट विल्यम याचा जन्म.

१८८८ मार्चमध्यें पहिल्या विल्यमचा मृत्यु व कैसरचा बाप फ्रेडरिक याचें राज्यारोहण. जूनमध्यें फ्रेडरिकचा मृत्यु व कैसरचें राज्यारोहण. कैसरचा पांचवा मुलगा ओस्कार याचा जन्म.

१८८९ कैसरचा अथेन्स व इस्तंबूल येथें प्रवास.

१८९० बिस्मार्कचा राजीनामा व क्याप्रिव्ही चान्सेलर. हेलिगोल्यांड बेट जर्मनीला मिळालें. कैसरचा सहावा मुलगा जोआशिम याचा जन्म.

१८९१ आस्ट्रियाचा बादशहा फ्रान्सिस जोसेफ कैसरच्या भेटीला बर्लिन शहरीं येतो.

१८९२ कैसरची मुलगी विक्टोरिया लुइसी हिचा जन्म.

१८९४ क्याप्रिव्हीचा राजीनामा व होहेनलोहे चान्सेलर.

१८९५ कील कालवा सुरू.

## कैसरच्या आयुष्यांतील मुख्य गोष्टींची जंत्री.

१८५९ जानेवारी २७ कैसरचा जन्म.

१८६१ कैसरचा आजा प्रशियाच्या गादीवर बसला.

१८६२ बिस्मार्क प्रशियाचा मुख्य प्रधान झाला. कैसरचा भाऊ प्रिन्स हेनरी याचा जन्म.

१८६४ प्रशियानें डेनमार्कबरोबर युद्ध करून श्लेसविग व होल्सटीन हे परगणे मिळविले.

१८६६ प्रशियानें आस्ट्रियाचा पराभव केला.

१८७०-७१ प्रशियाचें व इतर जर्मन संस्थानांचें फ्रान्स-बरोबर युद्ध.

१८७१ फ्रान्सबरोबर तह होऊन अल्सेस व लोरेन प्रांत आणि २० कोटी पौंड खंडणी जर्मनीला मिळते. जर्मन संस्थानांचें एकीकरण, जर्मन साम्राज्याची स्थापना, आणि प्रशियाच्या राजाला कैसर विल्यम (पहिला) या नांवानें जर्मन बादशहा या नात्यानें व्हर्सेलिस येथील फ्रेंच राजवाड्यांत राज्याभिषेक.

१८७४-१८७७ कैसरचा क्यासेल येथें विद्याभ्यास.

१८७७-१८७८ रशिया व टर्की यांचें युद्ध आणि बर्लिन येथें तह.

१८७९ जर्मनी व आस्ट्रिया यांचा संधि.

१८८१ कैसरचें लग्न.

१८८२ कैसरचा थोरला मुलगा क्राऊन प्रिन्स फ्रेडरिक विल्यम याचा जन्म. जर्मनी, आस्ट्रिया व इटाली यांचा तुल्यारिमित्र संधि.

१८८३ कैसरचा दुसरा मुलगा ईटेल फ्रेडरिक याचा जन्म.

१८८४ आफ्रिकेमध्यें टोगोल्यांड, कामेरून आणि जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका जर्मनीला मिळालीं. कैसरचा तिसरा मुलगा अडलबर्ट याचा जन्म.

१८८७ कैसरचा बाप अर्बुद रोगानें अत्यवस्थ. कैसरचा चवथा मुलगा आगस्ट विल्यम याचा जन्म.

१८८८ मार्चमध्यें पहिल्या विल्यमचा मृत्यु व कैसरचा बाप फ्रेडरिक याचें राज्यारोहण. जूनमध्यें फ्रेडरिकचा मृत्यु व कैसरचें राज्यारोहण. कैसरचा पांचवा मुलगा ओस्कार याचा जन्म.

१८८९ कैसरचा अथेन्स व इस्तंबूल येथें प्रवास.

१८९० बिस्मार्कचा राजीनामा व क्याप्रिव्ही चान्सेलर. हेलिगोल्यांड बेट जर्मनीला मिळालें. कैसरचा सहावा मुलगा जोआशिम याचा जन्म.

१८९१ आस्ट्रियाचा बादशहा फ्रान्सिस जोसेफ कैसरच्या भेटीला बर्लिन शहरीं येतो.

१८९२ कैसरची मुलगी विक्टोरिया लुइसी हिचा जन्म.

१८९४ क्याप्रिव्हीचा राजीनामा व होहेनलोहे चान्सेलर.

१८९५ कील कालवा सुरू.

१८९६ जानेवारी ३ कैसरची क्रूगरला तार.
१८९७ चीनमध्यें कियोचौ बंदरांत दोघां जर्मन पाद्र्यांचे खून.
१८९८ जर्मनीला कियोचौ मिळालें. बिस्मार्कचा मृत्यु. कैसरचा पालेस्टाइन प्रांतांत प्रवास.
१८९९ जर्मनीनें क्यारोलिन बेटें स्पेनपासून विकत घेतलीं.
१९०० चीनमधील बाक्सर बंड व जर्मन वकीलाचा खून. आस्ट्रियाचा बादशहा बर्लिन शहरीं आला. होहेन-लोहेचा राजीनामा व प्रिन्स ब्यूलो चान्सेलर.
१९०१ कैसरच्या डोळ्यावर वीलंड यानें लोखंडाचा तुकडा फेकला. कैसरच्या आईचा मृत्यु. "आमचा भविष्यकाळ समुद्रावर आहे" असे कैसरचे उद्गार. प्रिन्स चून चीनी दरबारच्या वतीनें कैसरची क्षमा मागण्यास आला.
१९०२ इंग्लंड, जर्मनी आणि इटाली वेनेझुएला देशाची नाकेबंदी करून तेथील सरकारास नरम आणतात.
१९०३ कैसरच्या घशांत व्रण व त्यावर शस्त्रक्रिया.
१९०४ इंग्लंडचा फ्रान्स व रशिया यांच्याबरोबर सलोखा.
१९०५ मोरोक्को प्रकरणाचा आरंभ. क्राउनप्रिन्सचें लग्न.
१९०६ अलजेसिरास येथील परिषद. कैसरच्या राजवाड्यांतले कांहीं लोक अयोग्य कृत्यांमुळें कामावरून दूर. कैसरला नातू झाला.
१९०७ कैसरला आक्सफर्ड विश्वविद्यालयाकडून एलएल.

डी:ची पदवी.

१९०८ डेली टेलिग्राफ प्रकरण. बोसनिया व हर्झेगोविना प्रांत आस्ट्रियानें खालसा केले.

१९०९ मोरोक्कोसंबंधानें फ्रान्स व जर्मनी यांचा करारनामा. प्रिन्स ब्यूलोचा राजीनामा व डा. बेथमन–हालवेग चान्सेलर.

१९१० कैसर व फ्रान्सिस जोसेफ यांची व्हिएन्ना येथें भेट. क्राउन प्रिन्स हिंदुस्थानांत प्रवासास येतो.

१९११ जुलै ३ पँथर जहाज मोरोक्कोच्या अगादीर बंदरीं कैसर पाठवितो. नोवेंबर ५ मोरोक्को प्रकरणाचा निकाल.

१९१४ कील कालवा अधिक खोल खणण्याचें काम पुरें झालें. महायुद्धाचा प्रारंभ.

१९१७ डा. बेथमन–हालवेगचा राजीनामा व डा. मायकेलिस चान्सेलर.

समाप्त.